## महायुती आणि ‘मविआ’तील जागावाटपाचा फॉर्म्युला स्पष्ट




**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच मंगळवारी (दि. २९) महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपाची स्थिती स्पष्ट झाली. भाजप १४८, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना ८५, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या वाट्याला ५१ जागा आल्या आहेत. उर्वरित चार जागा मित्रपक्षांना सोडण्यात आल्या आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीत काँग्रेस १०२, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ९६ आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला ८७ जागा मिळाल्या आहेत. पाच जादाचे उमेदवार सोडले तर या जागा २८० होत आहेत. यानुसार ‘मविआ’ने मित्रपक्षांना आठ जागा सोडल्या आहेत, तर पाच जागांवर दोन-दोन उमेदवार दिले आहेत. पाच जागांवर तीनपैकी दोन पक्षांचे उमेदवार असलेले मतदारसंघ हे मिरज, सांगोला, पंढरपूर, परांडा, दिग्रस हे आहेत. आता या जागांवर कोण माघार घेते किंवा मैत्रीपूर्ण लढत होते का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १०४
www.ramprahar.com

बुधवार, ३० ऑक्टोबर २०२४ ◆पाने ८ ◆किंमत ₹२


### अंतरंग



आमदार महेंद्र थोरवे, मंदा म्हात्रे यांचा अर्ज दाखल/२

‘आमदार गोगावले लाखाच्या फरकाने निवडून येणार’/५

रायगडात पोलीस निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती/७



# बाळाराम पाटील नक्की शेकापचे की ‘उबाठा’चे?

### गोंधळलेल्या उमेदवाराकडून अर्जासोबत दोन्ही शपथपत्रे दाखल



Page 2 of 13

भाग अ



Page 2 of 13

भाग अ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीत विजयाच्या वल्गना करणारे शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील हे पूर्णपणे गोंधळलेल्या स्थितीत आहेत, कारण त्यांनी मंगळवारी (दि. २९) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या उमेदवारी अर्जासोबत शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या दोन्ही पक्षांचे उमेदवार असल्याचे शपथपत्र जोडले आहे. त्यामुळे दोन्ही दगडांवर पाय ठेवणारे पाटील ऐन निवडणुकीमध्ये पुरते संभ्रमात असल्याचे दिसून येत आहे.

एकेकाळी शेकापचा रायगड जिल्ह्यासह राज्यात दरारा होता. शेकापची भूमिका राजकीय क्षेत्रात आवर्जून विचारात घेतली जात असे, मात्र अलिकडे शेकाप नेत्यांनी ध्येय-धोरणांना हरताळ फासत राजकीय मूल्ये पायदळी तुडवली. स्वार्थापोटी कुणाच्याही सोबत जाऊन जे मिळेल ते पदरात पाडून घ्यायचा एककलमी कार्यक्रम राबवला. त्यामुळे कार्यकर्ते मात्र नाराज झाले आहेत.

लढवय्या अशी ओळख असलेला शेकाप सरलेल्या लोकसभा निवडणुकीत इतरांचा टेकू देणारा पक्ष ठरला आणि आता विधानसभा निवडणुकीत तर दोन दगडांवर पाय ठेवण्याची वेळ शेकाप नेत्यांवर आली आहे. शेकापचे पनवेल विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बाळाराम पाटील यांनी मंगळवारी आपला अर्ज दाखल केला, मात्र त्यांनी अर्जासोबत शेकाप आणि उबाठा या दोन्ही पक्षांचे आपण उमेदवार असल्याचे शपथपत्र सादर केले. त्यामुळे पाटील नक्की कोणत्या पक्षाचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. खुद्द शेकाप तसेच उबठाचे कार्यकर्तेही या प्रकाराने गोंधळलेल्या स्थितीत आहेत.

## दमदार आमदार महेश बालदी यांचा अर्ज दाखल; हजारो जणांची उपस्थिती

# उरणमध्ये विकासाची गंगा -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**उरण : प्रतिनिधी**

उरणमध्ये विकासाची गंगा आणणारे महेशजी या निवडणुकीत तुमचा विजय निश्चित आहे, मात्र आता नुसता विजय नको तर रेकॉर्ड ब्रेक करा. विकासकामांच्या जोरावर रेकॉर्ड ब्रेक मतांनी आमदार महेश बालदी यांना विजयी करा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाइं व मित्रपक्ष महायुतीचे उरण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार व विद्यमान आमदार महेश बालदी यांचा उमेदवारी अर्ज मंगळवारी (दि. २९) जोरदार शक्तिप्रदर्शन करीत दाखल करण्यात आला. त्यानिमित्ताने झालेल्या सभेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बोलत होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले की, श्री शिव समर्थ स्मारकाच्या उद्घाटनाला मी या ठिकाणी आलो होतो. त्या वेळी ज्येष्ठ निरूपणकार अप्पासाहेब धर्माधिकारी यांचा आशीर्वाद मागितला होता. हा परिसर आता विकासकामांनी बदलून गेला आहे. या भागात रेल्वे पोहचली, अनेक विकासाचे प्रकल्प सुरू झाले. पागोटे ते चौक साडेचार हजार कोटींचा रस्ता मंजूर झाला आहे. तिसऱ्या मुंबईतून हा हायवे आहे. त्यामुळे बंगळुरूपर्यंतचा प्रवास कमी वेळेत पूर्ण करता येणार आहे. एवढा बदल या ठिकाणी होणार आहे.

येथे झालेली सर्व कामे माझ्यामुळे नाही, तर आमदार महेश बालदी यांच्यामुळे झाली. त्यांना या कामाचे श्रेय द्यावे लागेल. आता या भागाचा प्रत्येक प्रश्न मार्गी लागला आहे. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय जेट्टी, येथील शेतकऱ्यांना साडेबारा टक्क्याचा परतावा मिळावा यासाठी आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर हे माझ्याकडे आले. त्यांनी याबाबत समस्या मांडली. त्यानंतर तेही मार्गी लागले. येथे रस्ते, रेल्वे आली. या भागातील लोकांना रोजगार मिळाला आहे. हे चित्र बदलण्याचे काम आमदार महेश बालदी यांनी केले आहे, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री गडकरी यांनी त्यांचे कौतुक केले.

येथील विकासकामांसाठी अनेक निवेदने आमदार महेश बालदी यांनी माझ्याकडे दिली. त्यामुळे या भागाचा अतिशय वेगाने विकास होत आहे, असे सांगून नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दि.बा. पाटील यांचे नाव दिले पाहिजे, कारण त्यांनी येथील शेतकरी लढे उभारले आहेत, असे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी या वेळी आवर्जून सांगितले. **(पान २ वर..)**



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)




### मागील पाच वर्षे ट्रेलर सुरू होता, पिक्चर अद्याप बाकी -आमदार महेश बालदी

या वेळी आपल्या भाषणात महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांनी, मागील पाच वर्षे विकासकामांचा ट्रेलर सुरू होता. पिक्चर अद्याप बाकी आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मला मोठ्या मताधिक्याने विधानसभेत पाठवा, असे आवाहन केले.

न्हावा-शिवडीला जोडणाऱ्या अटल सेतूमुळे उरणचे चित्र बदलले आहे. आठ पदरी महामार्ग, विमानतळ आणि अनेक प्रकारचे उद्योग येथे आले. या मतदारसंघात आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुमारे २५४ कोटींचे मासळी बंदर साकारण्यात आले. त्याचा फायदा येथील स्थानिक मच्छिमार बांधवांना होणार असल्याचे समाधान मला असून नियमित पाठपुरावा केल्याने हे शक्य झाले असल्याचे आमदार महेश बालदी म्हणाले

उरण रेल्वे तर पोहचली, आता ही रेल्वे उरण येथून नेरूळपर्यंत न राहता थेट मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनल, ठाणे, पनवेल करण्याचा आमचा पाठपुरावा सुरू आहे. याशिवाय येथील रेल्वेस्थानकात पार्किंगचे चार्जेस अधिक प्रमाणात घेतले जाते. ते बंद करण्यासाठी प्रयत्न करणार, असे सांगून जेएनपीटी येथील सीआरएस फंड आदिवासींच्या विकासासाठी लावणार आहे. यापुढे येथील कडेकपारीत राहणारा आदिवासी कुडाच्या किंवा मातीच्या घरात राहताना दिसणार नाही, त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेणार आहोत, असेही आमदार महेश बालदी यांनी नमूद केले.

## पनवेलमधील ‘उबाठा’चे कार्यकर्ते भाजपत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होत विविध पक्षातील कार्यकर्ते भाजपमध्ये सहभागी होत आहेत. याच धर्तीवर पनवेल प्रभाग १९मधील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी युवा निर्धार मेळाव्याचे औचित्य साधून भाजपत जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पक्षात स्वागत केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. **(पान २ वर..)**

## आर. आर. पाटीलांनी केसाने गळा कापला -उपमुख्यमंत्री पवार

**तासगाव :** ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप फक्त मला बदनाम करण्यासाठी झाला होता तसेच या आरोपानंतर माझी खुली चौकशी करण्याच्या आदेशावर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी स्वाक्षरी केली होती, असा खळबळजनक दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. ते तासगाव येथे बोलत होते.

केवळ मला बदनाम करण्यासाठी ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप केले गेले, पण महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून सरकारी कर्मचाऱ्यांचा आणि इतर खर्च ४२ हजार कोटी एवढा होता. मग ७० हजार कोटींचा घोटाळा कुठून होणार? पण आकडाच इतका मोठा होता की, त्यातून माझी बदनामी झाली. पुढे चौकशीसाठी एक फाईल तयार केली गेली होती. ती फाईल गृहखात्याकडे गेल्यानंतर आर.आर. पाटील यांनी माझी खुली चौकशी करावी, म्हणून स्वाक्षरी केली. केसाने गळा कापायचे धंदे झाले राव, असे उपमुख्यमंत्री अजित पवार या वेळी म्हणाले. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**




# सर्वसामान्य नागरिकांचे भाजप महायुती सरकार

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; नवीन पनवेलमध्ये रॅली





**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांवर फक्त भाजप महायुती सरकार काम करू शकते. त्यामुळे प्रत्येक मतदारापर्यंत पोहचून आपण केलेल्या विकासकामांची माहिती द्या आणि त्याचबरोबर त्यांच्या सूचनाही समजून घ्या, असे आवाहन भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आणि कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेलमध्ये प्रचार सभेवेळी केले तसेच आजपासून मोठ्या विजयाच्या दिशेने आपला प्रवास सुरू झाल्याचा विश्वास कार्यकर्त्यांना दिला.

पनवेल विधानसभा मतदारसंघातून चौथ्यांदा विजयी होण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर सज्ज झाले आहेत. त्यांनी सोमवारी महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून अर्ज दाखल करून आपल्या विजयाचा शंखनाद केला. त्यानंतर नवीन पनवेल प्रभाग १६मधून आपल्या प्रचाराचा नारळ फोडला. या वेळी भव्य प्रचार रॅली काढण्यात आली होती. या रॅलीची सांगता शांतीनिकेतन स्कूलच्या मैदानात आयोजित प्रचार सभेत झाली. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. ज्या पद्धतीने तुम्ही आतापर्यंत साथ दिली ती यापुढेही द्या आणि पनवेल मतदारसंघाचा अधिक विकास करण्याची संधी द्या, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयामध्ये प्रभाग १६ कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही दिली.

प्रचार रॅली आणि सभेवेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, **(पान २ वर..)**

# आर.आर. पाटीलांनी केसाने गळा कापला

## ■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा खळबळजनक दावा



**तासगाव : प्रतिनिधी**

७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप फक्त मला बदनाम करण्यासाठी झाला होता, तसेच या आरोपानंतर माझी खुली चौकशी करण्याच्या आदेशावर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी स्वाक्षरी केली होती, असा खळबळजनक दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. ते तासगाव येथे बोलत होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, केवळ मला बदनाम करण्यासाठी ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप केले गेले, पण महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून सरकारी कर्मचाऱ्यांचा आणि इतर खर्च ४२ हजार कोटी एवढा होता. मग ७० हजार कोटींचा घोटाळा कुठून होणार? पण आकडाच इतका मोठा होता की, त्यातून माझी बदनामी झाली. पुढे चौकशीसाठी एक फाईल तयार केली गेली होती. ती फाईल गृहखात्याकडे गेल्यानंतर आर.आर. पाटील यांनी माझी खुली चौकशी करावी, म्हणून स्वाक्षरी केली. केसाने गळा कापायचे धंदे झाले राव. नंतर आम्ही पृथ्वीराज चव्हाण यांचा पाठिंबा काढून घेतल्यामुळे सरकार गेले व राष्ट्रपती राजवट लागली.

राष्ट्रपती राजवट लागल्याने तत्कालीन राज्यपालांनी फाईलवर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. निवडून आलेले सरकार यावर निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले. त्या वेळी देवेंद्र फडणवीस यांचे सरकार निवडून आले. फडणवीस यांनी फाईलवर स्वाक्षरी केली. त्यांनी मला घरी बोलावले आणि फाईल दाखवली. ते म्हणाले, तुमच्या आबाने तुमची चौकशी करण्यासाठी या फाईलवर स्वाक्षरी केली आहे. आता मला मुख्यमंत्री म्हणून सही करावी लागेल. मला त्या दिवशी खूप वाईट वाटले, अशी खंत उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केली. जीवाभावाचा सहकारी, पण माझे काहीतरी चुकले असेल म्हणून मला कामाला लावून बाबा, असेही ते पुढे म्हणाले.

आर.आर. गेल्यानंतर स्मिताच्या लग्नासाठी मी उभा राहिलो. माझ्या जिजाई बंगल्यात लग्न झाले. मी उपकार केले नाहीत, तर सहकाऱ्याच्या मुलीसाठी मी केले होते, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीत पोलीस बंदोबस्तामध्ये वाढ


## ठिकठिकाणी तपासणी; सहकार्य करण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई उपनगर जिल्ह्यात बंदोबस्त वाढविण्यात आला असून स्थिर व फिरत्या पथकांकडून ठिकठिकाणी तपासणी सुरू आहे. तपासणीत सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

आदर्श आचारसंहितेची २८ पथके स्थापन करण्यात आली आहेत. २११ भरारी पथके, २२६ स्थिर पाहणी पथके, १७२ व्हिडिओ निगराणी पथके, ६५ व्हिडिओ पाहणी पथके स्थापन करण्यात आली आहेत. १०५ तपासणी नाके आहेत.

निवडणूक काळात नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी कोणतेही साहित्य, रक्कम सोबत ठेवताना त्यासंदर्भाचे योग्य दस्तावेज सोबत ठेवावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. विधानसभा



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कडेकोट बंदोबस्त करण्यात आला असून दाखल झालेले निवडणूक निरीक्षक तपासणी संदर्भात जागरूक असून जिल्ह्यातील जप्ती प्रकरणातील आढावा घेण्यात येत आहे.

विधानसभा निवडणुकीदरम्यान कोणत्याही परिस्थितीत पैशांचा गैरवापर, मद्याचा पुरवठा, भेटवस्तूंचे वाटप किंवा कोणतेही अमिष दिले जाऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनासह इन्कम टॅक्स, राज्य उत्पादन शुल्क, केंद्रीय वस्तू आणि सेवा कर, राज्य वस्तू आणि सेवा कर, व्यावसायिक कर, अमली पदार्थ नियंत्रण दल, सीमा सुरक्षा दल, सशस्त्र सीमा दल, पोलीस दल केंद्रीय, औद्योगिक सुरक्षा दल, भारतीय किनारा दल, रेल्वे संरक्षण दल, पोस्ट विभाग, वन विभाग, नागरी उड्डान विभाग, विमानतळ प्राधिकरण, राज्य नागरी विमान वाहतूक विभाग, राज्य परिवहन विभाग, यांच्यासह फिरते पथक (एफएसटी) स्टॅटिक सर्विलन्स टीम (एसएसटी) कार्यरत आहेत.

निवडणूक काळात वाहनांची कसून तपासणी होत असून दररोज हा अहवाल निवडणूक विभागाला सादर केला जात असल्याची माहिती निवडणूक प्रशासनाने दिली आहे.

# अलिबाग विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी (दि.२९) शिवसेना ठाकरे गटाचे सुरेंद्र म्हात्रे यांनी तर काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला.

शेकाप महाविकास आघाडीमध्ये आहे. महाविकास आघाडीतून शेकापला किती कोणत्या जागा सोडल्या आहेत हे जाहीर करण्यात आले नव्हते, तरीदेखील शेकापने राज्यातील सहा जागांवर आपले उमेदवार जाहीर केले. त्यात रायगड जिल्ह्यात चार उमेदवारांचा समावेश आहे. अलिबाग विधानसभा मतदारसंघात शेकाप महिला आघाडीच्या चित्रलेखा पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे स्पष्ट झाले होते.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शिवसेना ठाकरे गटाने जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांना उमदवरी जाहीर केली. सुरेंद्र म्हात्रे यांनी आपला उमेदवारी अर्ज मंगळवारी दाखल केला. एकीकडे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी रायगडात एकही जागा काँग्रेसला न मिळाल्याने सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यातच काँग्रेसने आपला अधिकृत उमेदवार जाहीर केला नसला तरी काँग्रेसचे रायगड जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर यांनी अपक्ष उमेदवार म्हणून आपला अर्ज दाखल केला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्येही मोठ्या प्रमाणात संभ्रम निर्माण झाला आहे.

या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी उमदेवारी अर्ज भरला आहे.

# जोरदार शक्तिप्रदर्शनाने आमदार महेंद्र थोरवे यांचा अर्ज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी मंगळवारी (दि.२९) आमदार महेंद्र थोरवे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी शिवसेना, भारतीय जनता पक्ष, रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) या पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कर्जत विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुदत संपली आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी आजपर्यंत १३ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. महेंद्र थोरवे यांनी अर्ज दाखल करण्यासाठी पोसरी येथील शिवतीर्था पासून ढोल पथकाच्या तालावर मिरवणूक काढली. त्यानंतर संभाजी महाराजांना अभिवादन करून



श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतले व मिरवणुकीने कर्जत शहरात प्रवेश केला. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून प्रशासकीय भवनामध्ये जाऊन आपले अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्याकडे दाखल केले. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, दीपक बेहेरे, आरपीआयचे राहुल डाळिंबकर उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्याच्या निर्धारित मुदतीत शिवसेना, भाजप तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, बहुजन समाज पक्ष, बळीराजा पक्ष आदींसह अपक्ष अशा १३ उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केले.

**आजपर्यंत दाखल झालेले अर्ज**

सुधाकर परशुराम घारे अपक्ष, महेंद्र सदाशिव थोरवे शिवसेना, नितीन नंदकुमार सावंत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, किरण खंडू ठाकरे भारतीय जनता पक्ष, किरण खंडू ठाकरे अपक्ष, नमिता सुधाकर घारे, अपक्ष, श्रीराम बळीराम महाडिक बसपा, सुधाकर यादवराव घारे अपक्ष, महेंद्र लक्ष्मण थोरवे अपक्ष, जावेद अकदास खोत अपक्ष, सुधाकर शंकर घारे अपक्ष, विशाल विष्णू पाटील अपक्ष, किशोर साळुंखे बहुजन क्रांती पक्ष.

दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी बुधवारी (दि.३०) होणार आहे.

# शक्तिप्रदर्शन करीत आमदार मंदा म्हात्रे यांचा अर्ज दाखल

## आजवरच्या कामावर निवडणूक लढणार असल्याचा निर्धार



**नवी मुंबई : बातमीदार**

संपूर्ण राज्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्याच अनुषंगाने अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी (दि.२९) बेलापूर मतदासंघाच्या भाजपच्या उमेदवार आमदार मंदा म्हात्रे यांनी आपला अर्ज दाखल केला.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष नामदेव भगत, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, शिवसेना नवी मुंबई संपर्कप्रमुख किशोर पाटकर, राष्ट्रवादी महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव बाळासाहेब बोरकर, भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, बेलापूर विधानसभा समन्वयक संदीप लेले यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी, बेलापूर विधानसभा क्षेत्रातील गेली २५ वर्षांपासूनची जुने कार्यकर्ते असून ते आजपर्यंत माझ्यासोबतच आहेत. त्यामुळे माझा कार्यकर्ता हीच माझी मोठी ताकद असून आज त्यांच्या समवेत मी नामांकन अर्ज दाखल केला आहे. ही लढाई महिलाशक्ती विरूद्ध धनशक्ती अशी असल्याचे आमदार म्हात्रे म्हणल्या, तसेच भाजप महायुती पक्ष कायमच विकासाचा मुद्दा घेऊनच राजकारणात कार्य करीत आहे. त्यामुळे आम्ही विकास कामावरच बोलणार असल्याचे सांगितले.

# निजामपूर रोडवर दुचाकी-पीकअप गाडीचा अपघात; एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे-दिघी मार्गावरील निजामपूर रोडवर पाणोसे गावच्या हद्दीत दुचाकी व पिकअपमध्ये अपघात होऊन एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि.२९)सकाळी ११ वा. च्या सुमारास उमेश सारखले (वय ४७, रा. पाली) हे दुचाकी (एमएच ०६ बीसी ८९१८) घेऊन पालीवरून निजामपूर ते माणगाव अशी चालवित घेऊन जात असताना, पाणोसे गावचे हद्दीत नागमोडी वळणाच्या रस्त्यावर समोरून येणाऱ्या पिकअप (एमएच १२ व्हीएफ ६९७४)वरील चालकाने बेदरकारपणे विरूद्ध बाजूला येत दुचाकीला ठोकर मारून अपघात केला. या अपघातात सारखले यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील पोसई चव्हाण करीत आहेत.



# नवी मुंबईत मतदारजागृतीला वेग

**नवी मुंबई : बातमीदार**

विधानसभा निवडणूक मतदार जागरुकता कार्यक्रमांतर्गत ऐरोली व बेलापूर विधानसभा मतदारसंघात स्वीप कार्यक्रमांतर्गत जनजागृती करण्यात येत आहे. नमुंमपा आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली व स्वीपचे नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली नागरिकांपर्यंत पोहचून त्यांना मतदान करण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.

ऐरोली विधानसभा मतदारसंघात सेक्टर १७ येथील पोस्ट ऑफिसमध्ये स्वीप पथकाने तेथील अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे मतदान करण्याविषयी प्रबोधन केले. महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ रुग्णालयातही डॉक्टर्स, नर्सेस, तेथील




रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना भेटून मतदानाविषयक जनजागृती करण्यात आली. तुर्भे प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रातही स्वीप पथकाने भेट देऊन डॉक्टर, नर्सेस व इतर उपस्थितांना मतदान करण्याविषयी प्रोत्साहित केले.

घणसोली स्टेशनबाहेरील रिक्षाचालकांशीही संवाद साधत त्यांना मतदान करण्याविषयी आवाहन करतानाच रिक्षावर मतदानाचा संदेश असलेले स्टीकर्स लावण्याविषयी सांगण्यात आले. फटाका विक्रीच्या स्टॉलला भेटी देऊन स्टॉल विक्रेते व ग्राहकांनाही मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. बेलापूर विधानसभा मतदारसंघातही सेक्टर २५ समाजमंदिर सभागृह, जुईनगर, नेरूळ या ठिकाणी उपस्थित नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे तुर्भे गाव सेक्टर २३ व सेक्टर २२ या ठिकाणी एनएसएस विद्यार्थ्यांची जनजागृतीपर मोठी रॅली काढण्यात आली. सर्व ठिकाणी मतदानाची प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली.

**पान १ वरुन**

## उरणमध्ये विकासाची गंगा -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी दोघांनी मिळून या भागाचा विकास साधला आहे. या भागातील आदिवासी बांधवांना त्यांच्या मालकीची हक्काची घरे मिळावी यासाठी मी प्रयत्न करणार आहे, असेही ना. गडकरी यांनी स्पष्ट केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्ष उमा मुंढे, शिवसेनेचे रूपेश पाटील यांनीही उपस्थितांना संबोधित करून आमदार महेश बालदी यांना विजयी करण्याचे आवाहन केले, तर आमदार महेश बालदी यांनी केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा मांडत यापुढील काळात अधिक कामे करण्यासाठी तुमचा आशीर्वाद द्यावा, असे म्हटले.

या वेळी व्यासपीठावर भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरणचे तालुका अध्यक्ष रवी भोईर, खालापूरचे तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, उरणच्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, भाजप शहराध्यक्ष व माजी नगरसेवक कौशिक शाह, उद्योगपती पी.पी. खारपाटील, राजेंद्र खारपाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष परिक्षित ठाकूर, वैजनाथ ठाकूर, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, जीवन गावंड, विजय भोईर, कुंदा ठाकूर, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, सुषमा म्हात्रे यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेलमधील ‘उबाठा’चे कार्यकर्ते भाजपत

पनवेलमध्ये केलेली आणि होत असलेली विकासकामे पाहून तरुणाई भाजपकडे आकर्षित होत आहे. अशाच प्रकारे ‘उबाठा’चे राजेंद्र भगत यांनी मनीष शृंगारपुरे, राजू ठाकूर, जयदीप भगत, प्रशांत बगेरा, मंदार भगत, मंगेश भगत, संदीप भोपी, अनंता म्हात्रे, चेतन सावंत, निखिल गायकर, सुबोध म्हात्रे या त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. भाजप शहर मंडल उपाध्यक्ष केदार भगत यांच्या प्रयत्नातून हा पक्ष प्रवेश झाला. या प्रवेशामुळे भाजपची युवाशक्ती आणखी वाढली आहे.

## सर्वसामान्य नागरिकांचे भाजप महायुती सरकार

माजी नगरसेवक समीर ठाकूर, अजय बहिरा, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, शिवसेनेच्या महिला तालुकाप्रमुख मंदा जंगले, भाजप नेते महेंद्र वावेकर, आरपीआयचे पनवेल अध्यक्ष प्रभाकर कांबळे, प्रभाग अध्यक्ष शिवाजी भगत, किशोर चौतमोल, अक्षय सिंग, देवराम शार्दुल, मयुर आंग्रे, विवेक होन, माया देवजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रचार रॅलीला मतदारांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे ठिकठिकाणी औक्षण करून विजयाचा आशीर्वाद देण्यात आला.

# महिला उत्कर्ष मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ■ तब्बल आठ लाखांची उलाढाल

**धाटाल : प्रतिनिधी**

स्पंदन संस्थेच्या महिला उत्कर्ष मेळाव्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. २६ ते २८ ऑक्टोबरदरम्यान सलग तीन दिवस भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात महिला उत्पादित वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनात ४१ स्टॉल होते. त्यात महिलांनी तयार केलेल्या आकर्षक मेणबत्या पणत्या, इमिटेशन ज्वेलरी, शोपिस, बॅग, विविध प्रकारचे भाजणी पीठ, साड्या ड्रेस मटेरियल, शोभिवंत वस्तू यांसह विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. तब्बल आठ लाखांची उलाढाल झाली. अध्यक्ष स्नेहा अंबरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी छान नियोजन केले.

स्पंदन संस्था आयोजित महिला उत्कर्ष मेळाव्याचे उद्घाटन वीज वितरण कंपनीच्या माजी अधिकारी अशा वागळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शन मेळाव्याची सांगता सोमवारी रात्री झाली. मानसी



मलकापूरकर यांना विशेष महिला लघु उद्योजक, सुजाता धनवी यांना विशेष कलाकुसर तर शीतल शहा यांना विशेष आकर्षक सन्मान संस्थेच्या अध्यक्ष स्नेहा अंबरे पदाधिकाऱ्यांनी गौरवले. गार्गी जाधव, श्रावणी सावंत या लहानग्या उद्योजकांचे विशेष कौतुक स्पंदनच्या महिला पदाधिकाऱ्यांनी करत कौतुकांची थाप दिली.

मेळावा यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष स्नेहा अंबरे, अलका नांदगांवकर, विद्या घोडींदे, श्रद्धा कोर्लेकर, जयश्री धनावडे, प्रियांका कांबळे, सुविधा वाकडे, मुक्ता राक्षे, राखी पाटील, माधवी मोरे, रूपाली इंदलकर, रेखा खटावकर, धनश्री पवार, शीतल दांडगव्हाळ, सुवर्ण देसाई, दीपा कुरकुंडे, ऋतुजा भोसले, मॅनेजमेंट प्रतीक राक्षे, राकेश वाडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

**दुखवटा**


### तारामती टके



**नागोठणे** : रायगड जिल्हा नाभिक संघाचे नेते, रोहा माजी तालुकाध्यक्ष रवींद्र टके यांच्या मातोश्री तारामती एकनाथ टके यांचे वयाच्या ९५व्या वर्षी वृद्धत्वाने शुक्रवारी (दि.२५) आमडोशी येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच विवाहित मुली तसेच जावई, सुना व नातवंडे-पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै.तारामती टके यांची दशक्रियाविधी ३ नोव्हेंबर रोजी आमडोशी ग्रामदैवत श्री मानकेश्वर मंदिरा जवळ व उत्तर कार्य ५ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी आमडोशी येथे होणार आहे.

## निवडक

### वावंजे येथून एक जण बेपत्ता



**पनवेल :** तालुक्यातील एन.के.गार्डन वावंजे पोलीस चौकीजवळ राहणारे एक ६० वर्षीय इसम कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याकुब युसून खान (६०, रा.रेहमान नगर), असे या व्यक्तीचे नाव असून चेहरा गोल, केस काळे पांढरे, अर्धवट टक्कल पडलेले, दाढी वाढलेली, मिशी नाही, सावळा वर्ण, बांधा मध्यम, डोळे काळे, नाक सरळ, उंची पाच फूट असून अंगात गुलाबी रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (२७४५२४४४) किंवा पो.हवा.अमर भालसिंग (९५९४३५८४४४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रेल्वेरूळामध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** जवळील सिमरन मोटर्स पाठीमागे असणाऱ्या वाल्ह्याचीवाडी झोपडपट्टीच्या बाजूला असणाऱ्या नाला व रेल्वे पटरीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून त्याचे शरिर पूर्णपणे कुजलेले असून व अंगावर एकही कपडा नाही. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोउपनि. हजरत पठाण (८७७९६५९५०८) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तळोजा वसाहतीत दोन गटात भांडणे

**पनवेल :** दिवाळी सणानिमित्त विद्युत रोषणाई एका सोसायटीच्या दोन गटामध्ये भांडणे झाल्याची घटना तळोजा वसाहतीमध्ये घडली आहे. येथील सेक्टर ९ या ठिकाणी असलेल्या पंचानंद हाऊस या सोसायटीमध्ये दिवाळी सणानिमित्त मधल्या भागात विद्युत रोषणाई करण्यात येत होती. या रोषणाईला सोसायटीतील विशिष्ट गटाने विरोध केला. यातून तेथील काही महिला रहिवाशांना अश्लिल भाषेत धमकाविण्यातसुद्धा आले. याबाबत या महिलांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार केल्याची माहिती मिळत आहे.

### मनसे कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**पनवेल :** कामोठे वसाहत परिसरातील शेकडो मनसेच्या कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला त्यांचे स्वागत जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी केले. शिवसेना कामोठे शहरप्रमुख सुनील गोवारी यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहरप्रमुख कमलाकर गायकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. कराडी समाज हॉल सेक्टर १४ कामोठे येथे पार पडलेल्या आजच्या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात हा प्रवेश झाला. या सर्वांचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी स्वागत करून या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा योग्य सन्मान राखण्यात येईल तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी शिवसेना पक्ष हा कायम त्यांच्या सोबत राहील, असे आश्वासन दिले.

### हेमलता पाटील यांना सेवानिरोप

**कळंबोली :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोलीतील मराठी प्राथमिक विभागाच्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील ह्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. सेवानिवृत्ती निमित्त त्यांच्या सेवापूर्ती सोहळा कळंबोलीतील सुधागड विद्या संकुलाच्या सभागृहात विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या वेळी संस्थेचे सचिव रविकांत घोसाळकर, सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, संस्थेचे प्रशासन अधिकारी मिलिंद जोशी, पनवेलचे शालेय पोषण आहार अधीक्षक नवनाथ साबळे, मुख्याध्यापक सुरेंद्र पाटील, मुख्याध्यापिका कल्पना कुलकर्णी, माजी मुख्याध्यापिका स्मिता पाटील, अरुणा उरणकर आदी उपस्थित होते.



# उत्तर भारतीयांचा भाजपमध्ये प्रवेश

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले पक्षात स्वागत





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित अनेक जण भाजपमध्ये सहभागी होत आहेत. त्या अनुषंगाने सुकापूर येथील उत्तर भारतीय बंधू भगिनी यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांना सर्व स्तरातून वाढता पाठिंबा मिळत आहे. पनवेलमध्ये केलेली आणि होत असलेली विकासकामे पाहून तरुणाई आकर्षित होत आहे. नितेश शर्मा यांच्या नेतृत्वाखाली मन्तलाल शर्मा, नितेश शर्मा, आशा शर्मा, दुतपाल शर्मा, रजनी सत्यप्रकाश सिंह, मृदुला नितेश शर्मा, शशी शर्मा, फुलमती शर्मा, जोत्स्ना अत्रे, जय पांडे, शीतल यादव, सुनिता चौधरी, सुनिता शर्मा, सुगंधा शास्त्री, आरती सिंग, बबिता शर्मा, पूनम यादव, ममता चौहान, सरिता चौहान, उशा चौहान, अनु प्रजापती, माया देवी, रंजना गुप्ता, निकी गुप्ता, सुशीला गुप्ता, रामो राणा, शीतल राणा, मालती भारती, बबिता गुप्ता, पूजा पाठक, लालती राठोड, अश्विनी राठोड, दिपाली राठोड, निकीता सिंग, रुपाली गुप्ता, रानी गुप्ता, रुहानी गुप्ता, सिधवती प्रजापती, चांदणी पटवा, रिंकी गौतम, सुमन भारतीय, पूजा प्रजापती, राजनंदिनी यादव, वासरी, राजभैर, आमचल राजभौर, मिताली राजभौर, सीमा राजभौर, प्रतिमा राजभौर, अस्मिता पांडे, सुमन गुप्ता, बबिता कोळी, रंजना सिंग, ममता पटेल, साक्षी कदम, पूनम विश्वकर्मा, आमपूजा विश्वकर्मा, दुलारी विश्वकर्मा, ममता, पूजा विश्वकर्मा, कुसूम मिश्रा, अंजू शर्मा, सुशमा यादव, सरयाना रंजित, कुमारी रामस्वा, गुडिया यादव, ब्रम्हमादेवी यादव, बिट्टू वर्मा, सधमा उपाध्याय, राकेश उपाध्याय, साक्षी उपाध्याय, निलम विश्वकर्मा, साम कुमारी, उशा जयस्वाल, संजना जयस्वाल, पूनम वर्मा, संगीता जयस्वाल, कमल जयस्वाल, निलम विश्वकर्मा, प्रतिमा जयस्वाल, उसा सरोज, इंद्रावती चौहान, तारा यादव, गुंजन पटेल, मीरा चौहान, जयमाला संजय, सीला यादव, रुपमीना सहानी, संगीता सहानी, शंभू शर्मा, रेणू नेशद, रिंकी मिश्रा, लालीदेवी शर्मा, गायत्री शर्मा, निलमाला, सुगंधा, सुनिता म्हस्के, संगीता कुमार, सविता प्रजापती, गुंजन सिंग, निशा चौहान, निलमाला कुमार, कुसूम, रिंकी उपाध्ये आदींनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमाला भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, महेश पाटील, राजेश पाटील आदींसह सुकापूर परिसरातील भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## लॉकरमधील दागिन्यांवर पत्नीनेच मारला डल्ला; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पती-पत्नीने संयुक्तपणे लॉकरमध्ये ठेवलेले सात लाख रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांवर पत्नीने डल्ला मारल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत सोन्याचे दागिने लॉकरमधून काढून नेल्याप्रकरणी पत्नीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात कलम ३८० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर १०, खारघर, कोपरा येथे राहणारे पती-पत्नी यांचे कौटुंबिक वाद सुरू असून, सध्या ते वेगवेगळे राहतात. दोघांनी मिळून फेब्रुवारी २०२१मध्ये बँक ऑफ इंडिया, से-१०, खारघर येथे लॉकर संयुक्तपणे अर्ज करून उघडला. त्यादिवशी त्यांनी सोन्याचे दागिने व काही कागदपत्र त्यात ठेवली. एप्रिल २०२४ मध्ये ते कागदपत्रे नूतनीकरणासाठी बँकेत गेले.

या वेळी लॉकरची तपासणी केली असता, त्यात सोन्याचे दागिने मिळून आले नाहीत. हे लॉकर चार वेळा वापरले गेल्याचे रजिस्टरवरून दिसून आले. याबाबत त्यांनी बँकेकडे तक्रार केली. त्यांच्या पत्नीने त्यांची खोटी नोंद आणि सही करून लबाडीच्या हेतूने लॉकरमधील सोन्याचे दागिने चोरून नेले असल्याचे समोर आले.

## टँकरची दुचाकीला धडक; एकाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजिवली स्टॉपजवळ दुचाकीला टँकरने धडक दिल्याने यात अनिल कुमार ठाकूर (वय ३९) याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी टँकरचालक परमेश्वर देविदास रणदिवे याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अनिल कुमार शिवजी ठाकूर हा भिंगारवाडी पनवेल येथील गॅरेजमधील काम संपवून पिवळ्या रंगाच्या होंडा डिओ स्कूटी (एमएच ४६ यु २३८४) ही चालवत घेऊन जात होता. आजीवली येथे त्याच्या राहत्या घरी येत असताना २६ ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास नवकार लॉजिस्टिक कंपनी गेट समोर आजीवली स्टॉप येथे आला. या वेळी पाठीमागून येणारा टँकर (एमएच ०१ सीव्ही ३०८२) वरील चालकाने टँकर भरधाव वेगाने चालवला आणि स्कुटीचालक अनिल कुमार यांच्या स्कूटीला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला.

या अपघातात अनिल कुमार हा गंभीर जखमी झाला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात मतदार जागृती उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक खांदा कॉलनीमधील संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राज्यशास्त्र विभाग आणि निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.२८) मतदार जनजागृतीविषयक विविध उपक्रमांचे महाविद्यालयाच्या कॉमर्स अँड मॅनेजमेंट रिसोर्स सेंटरमध्ये यशस्वी आयोजन करण्यात आले.



प्रास्ताविक निवडणूक साक्षरता मंडळाचे विद्यार्थी समन्वयक दक्ष परमार आणि साशा वाईंगणकर यांनी केले. महाविद्यालयाच्या मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी सर्व विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देवू केली व अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग आणि निवडणूक साक्षरता मंडळाने मतदार जनजागृती व नोंदणी करण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल राज्यशास्त्र विभाग व निवडणूक साक्षरता मंडळाचे समन्वयक प्रा. आकाश पाटील यांचे कौतुक केले.

याबरोबर आपल्या संबोधनात त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानिक मुल्यांची जोपासना करणे, मतदान करणे हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा न केवळ अधिकार आहे अपितु मतदानाच्या माध्यमातून योग्य लोकप्रतिनिधी निवडून देणे हे परमकर्तव्य असल्याचे प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी प्रतिपादन केले. आभार सिद्धी ओवळेकर, तर सूत्रसंचालन दक्ष परमार व साशा वाईंगणकर हिने केले.



उद्घाटन कार्यक्रमानंतर राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व विषद करून दिले. विद्यार्थ्यांना अभिरूप राज्यसभा निवडणुकीमध्ये मतदान कश्या पद्धतीने करण्यात यावे याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या. यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना विविध पक्ष आणि गटांमध्ये विभागण्यात आले व त्यांनी सकाळी ११ ते सायंकाळी ४ दरम्यान प्राधान्याक्रमाधारित मतदान केले.

यानंतर अर्ध्यातासाने, मतमोजणीच्या कार्यक्रमास विद्यार्थ्यांद्वारे नेमण्यात आलेल्या मतमोजणी प्रतिनिधींच्या व उमेदवारांच्या उपस्थितीमध्ये अभिरूप राज्यसभा निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. आकाश पाटील, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी साशा वाईंगणकर आणि देवेश सूर्यवंशी यांनी सुरवात केली. मतमोजणीच्या पहिल्या टप्प्यात मतपेटीमधील सर्व मतपत्रिका बाहेर काढून त्यातील वैध आणि अवैध मतपत्रिका वेगळ्या करून मतमोजणी प्रक्रिया सुरू केली.

अभिरूप निवडणुकीमध्ये एकूण सहा जागांसाठी सात उमेदवारांनी तर १५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मतमोजणीच्या चार फेऱ्या झाल्यानंतर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी साशा वाईंगणकर यांनी विजयी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली तथा त्यांच्या विजयाच्या घोषणेवर निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी मान्यतेची मोहोर उमटवली. सायंकाळी ५.३० वाजता सर्व विजयी उमेदवारांचे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी प्रमाणपत्र देवून सत्कार केला. तथा अभिरूप राज्यसभा निवडणूक आयोजन समितीच्या सदस्यांशी मुक्त संवाद साधत शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख तथा निवडणूक साक्षरता मंडळाचे समन्वयक प्रा. आकाश पाटील, राज्यशास्त्र विभागाचे समाधान साळवी, स्वप्नील पाटील, ओम घोडके, प्रीती मोरे, अंजली सोनकर, दुर्गेश मोरे, करूणा बागुल या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



**पनवेल : नितेश शर्मा यांची भाजप तालुका ग्रामीण उत्तर भारतीय सेलच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शर्मा यांना तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी भाजप अनुसूचित सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. महापालिकेच्यावतीने माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत फटाके व पर्यावरणपूरक सण-उत्सव अनुषंगाने वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.



आपण वैश्विक वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या आणि तापमानवाढीच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे महत्वाचे कारण आहे. विविध सण ,उत्सव प्रसंगी आपण फोडत असलेल्या फटाक्यांमुळे कार्बन डायऑक्साईड व सल्फरचे तसेच इतर विषारी वायूंचे प्रमाण वाढत असून, कार्बन डायऑक्साईड व सल्फरच्या वाढत्या प्रमाणामुळे हवेच्या प्रदूषणाची पातळी वाढत आहे.फटाक्यांमधून उत्सर्जित होणारे विषारी वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच सर्व मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदूषण थांबविण्यासाठी नागरिकांनी स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने विविध उपाय योजना आणि जनजागृती उपक्रम पनवेल महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत फटाकेमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल सण-उत्सव साजरे करावेत. पर्यावरणपूरक सण-उत्सव साजरा करण्यामध्ये पुढाकार घेत नागरीकांनी दिपावली कालावधीमध्ये फटाक्यांच्या वापर शक्यतो टाळावा. तथापि, दिवाळीच्या पूर्वसंध्येला फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू आणि ध्वनी प्रदूषणाबाबत, फटाक्यांच्या दुष्परिणामांबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

केवळ आवाज मुक्त प्रकाश फटाक्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांस अनुसरून फटाके फोडणाऱ्यांनी केवळ रात्री १० वाजण्याआधीच फोडावेत असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी रांगोळी आणि दिवे सजावट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अंतर्गत दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्यावतीने 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' सखोल स्वच्छता मोहिम व माझी वसुंधरा ५.० अंतर्गत आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा व दिवे सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



महापालिकेच्यावतीने चारही प्रभागांमध्ये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या वतीने 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' सखोल स्वच्छता मोहिम राबविली जात आहे. तसेच माझी वसुंधरा ५.०अंतर्गत नागरिकांनी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश महापालिकेच्यावतीने देण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा व दिवे सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन जी.एस. नरशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेचे डॉ.प्रसाद वायंगणकर, डॉ. फिलोमिना असाल, डॉ. निशा रेल वाणी, डॉ. तृप्ती पाटील, प्रा. सेल सुर्वे, प्रा. तारा जय कुमार यांनी परिक्षण केले. तसेच या स्पर्धेसाठी प्रा. प्राची नागरे, प्रा. रामदास कचरे यांनी सहकार्य केले.



## संपादकीय

# पंतप्रधानांचा सुरक्षा मंत्र!

'डिजिटल अरेस्ट' या सायबर फसवणुकीच्या प्रकाराबाबतीत सर्व नागरिकांनी 'थांबा, विचार करा आणि मग कृती करा' या मंत्राचा वापर करावा असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच 'मन की बात' मधून दिला. पंतप्रधानांना दखल घ्यावी लागली इतका हा सायबर फसवणुकीचा प्रकार बोकाळला असून अनेक नागरिक यात मोठ्या रकमा गमावून बसले आहेत. 'डिजिटल सुरक्षे'साठी सगळ्यांनीच पंतप्रधानांनी दिलेला हा मंत्र नीट आत्मसात करण्याची गरज आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर करताना पुरते जागरूक नसलेले नागरिक ऑनलाईन बँकिंग, ऑनलाइन खरेदी, बनावट संकेतस्थळे व प्सच्या माध्यमातून सायबर फसवणुकीला बळी पडत आले आहेत. त्यात आणखी एका प्रकाराची भर पडली आहे, तो प्रकार म्हणजे 'डिजिटल अरेस्ट'. यात सायबर गुन्हेगार स्वत: ईडी, इन्कम टॅक्स, कस्टम, पोलीस, सीबीआय वा अंमलीपदार्थविरोधी पथकाचे अधिकारी असल्याची बतावणी करत एखाद्या व्यक्तीला फोन करतात. स्वत: ती व्यक्ती अथवा कुटुंबातील एखादी व्यक्ती गुन्ह्यात अडकली असल्याचे सांगतात. साधा वा व्हिडिओ कॉल करून त्या व्यक्तीला अटकेची भीती दाखवतात. ती व्यक्ती 'डिजिटल अरेस्ट' म्हणजे अटकेत वा नजरकैदेत असल्याचे सांगितले जाते. व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून त्या व्यक्तीवर लक्ष ठेवून प्रचंड तणावाखाली आणले जाते. दबावाखाली आलेले नागरिक त्यांच्या सर्व आदेशांचे पालन करतात. काही जण तर इतके दबावाखाली येतात की जागचे हलत नाहीत वा घराबाहेर पडत नाहीत वा कुणाशीही संपर्क साधत नाहीत. तुम्ही नजरकैदेत आहात असे हे सायबर गुन्हेगार त्यांना भासवतात व सुटकेसाठी, अटक टाळण्यासाठी रकमांची मागणी करतात. सगळ्या बनावट प्रकाराला बळी पडून काही लाख रूपये त्या गुन्हेगारांनी सांगितलेल्या बँक क्रमांकांवर ट्रान्सफर करणारे अनेक नागरिक आहेत. फसवणुकीच्या या प्रकाराला अनेक गृहिणी, नोकरदार वा वयोवृद्ध स्त्रिया तसेच व्यवसाय-धंदा करणारे पुरुष बळी पडले आहेत. सायबर गुन्हेगार यासाठी व्यापाऱ्यांची निवड करतात किंवा ज्यांच्या बँक खात्यात मोठ्या रकमा असतील अशा व्यक्तींची निवड करतात. सरकारी भासणारी खोटी कागदपत्रे दाखवून ते बनाव घडवून आणत असल्यामुळे नागरिक त्याला बळी पडतात. तंत्रज्ञानाचा सफाईदारपणे वापर करणारे तरुणतरुणी अशा प्रकारांना सहसा बळी पडत नाहीत. अनोळखी व्यक्तीकडून व्हिडिओ कॉल आल्यास तो न स्वीकारणे किंवा 'डिजिटल अरेस्ट'सारख्या भंपक प्रकाराचा उल्लेख होताच कॉल कट करणे हे पहिले पाऊल असायला हवे. त्यानंतर आपल्या सर्व कुटुंबियांना, नातेवाईकांना या प्रकाराची माहिती देऊन त्यांनाही सावध करावे. पैशाची मागणी झाल्यास कुणीही पैसे देऊ नयेत हे सांगावे. अधिक काही त्रास दिला गेल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात, सायबर पोलीस ठाण्यात वा सायबर क्राइम हेल्पलाइन १९३० वर तक्रार करावी असे सांगितले जाते. बँकांचे कामकाज डिजिटल झाल्यामुळे सर्वसामान्यांच्याही बँक खात्याशी निरनिराळ्या योजना जोडल्या गेल्या आहेत. या न त्या निमित्ताने आपण आपला बँक खाते क्रमांक, मोबाइल क्रमांक, आधार कार्डचा क्रमांक अशी महत्त्वाची माहिती अनेक ठिकाणी देत असतो. अनोळखी लिंकवर क्लिक करू नये असे वारंवार सांगितले जाऊनही सर्वसामान्य बेफिकीरीने समाजमाध्यमांचा वापर करतात. निरनिराळ्या स्वरूपाची सायबर गुन्हेगारी वाढत चालली आहे त्यामुळे अधिक सजगपणे तंत्रज्ञानाचा वापर करणे हाच सुरक्षेचा एकमेव मार्ग आहे.**

# पनवेलमध्ये पहिल्या टप्प्यातच महायुतीची प्रचारात आघाडी

**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेल विधानसभा मतदारसंघात प्रचारात भाजपने आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांचा उमेदवार ठरला होता ते म्हणजे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर. शेकाप आणि महाविकास आघाडी मात्र अर्ज दाखल करावयाच्या शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवारांची चाचपणी करीत होती. शेकापचे माजी विधान परिषद सदस्य बाळाराम पाटील यांनी आपल्या नेत्याचे फोटो नसलेली पत्रके वाटून प्रचाराला सुरुवात केली होती, पण उबाठाने त्यांना पाठिंबा देण्यास नकार दिल्याने ते अवसान गेल्यासारखे शांत झाले होते, मात्र त्यांनी मंगळवारी शेकाप आणि उबाठा अशी दोन्ही शपथपत्रे अर्जासोबत जोडली. तत्पूर्वी उबाठाने सोमवारी लीना गरड यांना एबी फॉर्म दिल्यावर त्यांनी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर आता लीना गरड अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचे समजते.

पनवेल मतदारसंघ हा रायगड जिल्ह्यातल्या मावळ या लोकसभा मतदारसंघात मोडतो. या मतदारसंघात एकूण ४२३ मतदान केंद्र आहेत. पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यापासून ही दुसरी विधानसभा निवडणूक असणार आहे. व्यावसायिक दृष्टीनेही पनवेलचे विशेष महत्त्व असल्याचे लक्षात येते. विमानतळ असो किंवा मग जेएनपीटी बंदर. या सगळ्यामुळे आगामी काळात भूमिपुत्रांसाठी व्यवसाय, रोजगार हे मुद्देदेखील निवडणुकीत चर्चेत असणार आहेत. पनेवलमतदार संघातील खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल हे परिसर लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. वाढती वसाहत तसंच लोकसंख्येमुळे याचा थेट फायदा भाजपला होताना दिसतोय, तर काही भागांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील लोकांची संख्या जास्त आहे. हा मतदार राष्ट्रवादीकडे झुकणारा आहे. आता अजित पवार यांच्यामुळे ही मतेही सहज भाजपच्या पारड्यात पडणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला राज्यात मोठे यश मिळाले नाही. त्यामुळे आता महाराष्ट्रात होणार्‍या विधानसभा निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रातील कोकण विभागातील रायगड जिल्ह्यात असलेला १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघ म्हणजेच मुंबईच्या प्रवेशद्वारावर असलेला महत्वाचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात पनवेल महापालिका आणि पनवेल तालुक्यातील काही जिल्हा परिषद मतदारसंघांचा समावेश होतो. या मतदारसंघातील मतदारांच्या संख्येचा विचार केला, तर राज्यातील मोठ्या संख्येने असलेल्या पहिल्या तीन मतदारसंघात याचा समावेश होतो.

पनवेल विधानसभा मतदारसंघात १९६२ पासून २००४च्या निवडणुकीपर्यंत शेकापचे उमेदवार निवडून आले आहेत. त्यामध्ये १९६२ ते १९७२ आणि १९८० असे चार वेळा, दिनकर पाटील, १९७८,१९८५, आणि १९९० दत्तात्रय पाटील तीन वेळा, १९९५, १९९९ आणि २००४ विवेक पाटील तीन वेळा त्यानंतर मात्र २००९मध्ये प्रथमच शेकापच्या बाळाराम पाटील यांचा पराभव करून काँग्रेसचे उमेदवार म्हणून प्रशांत ठाकूर पहिल्यांदा निवडून आले. त्यानंतर २०१४मध्ये पुन्हा शेकापच्या बाळाराम पाटील यांचा पराभव करून ते भाजपमधून निवडून आले. २०१४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे प्रशांत रामशेठ ठाकूर १,२५,१४२ मतांनी विजयी झाले. पीडब्ल्यूपीआय पक्षाचे बाळाराम दत्तूशेठ पाटील (बाळशेठ) हे उपविजेते ठरले. विजयाचे अंतर होते: १३,२१५ मते. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे प्रशांत रामशेठ ठाकूर १,७९,१०९ मतांनी विजयी झाले. शेकापच्या हरेश केणी यांचा ९२,७३० मतांनी पराभव केला. यानंतर केणी यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

सन २००९मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवार प्रशांत ठाकूर यांना ८०, ६७१मते म्हणजे ४९.११ टक्के, शेकापला ६७,७१० म्हणजेच ४१.२२ टक्के आणि मनसेला ८,८१८ मते म्हणजे ५.३७ टक्के मते मिळाली प्रशांत ठाकूर १२,९६१ मतांनी निवडून आले. त्यानंतर २०१४मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांना १,२५,१४२ मते म्हणजेच ४४.१६ टक्के शेकापला१,११,९२७ मते म्हणजे ३९.५० टक्के सेना १७, ९५३ म्हणजे ६.३४ टक्के सेनेला १७,९५३ मते म्हणजेच ६.३४ टक्के आणि काँग्रेसला ९,२६९ मते म्हणजचे ३.२७ टक्के मते मिळाली या वेळी शेकापची १.७२ मते कमी झालेली दिसून येतात. २००४च्या निवडणुकीत शेकापचे विवेक पाटील निवडून आले त्या वेळी त्यांना ४७.५१ टक्के मते मिळाली होती. म्हणजेच त्यानंतर या मतदारसंघात शेकापची मते प्रत्येक निवडणुकीत कमी होत असलेली दिसत आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रयत्नाने २०१६मध्ये पनवेल महापालिका झाली. पनवेल महापालिका हद्दीत खारघर, कळंबोली, कामोठे आणि नवीन पनवेल या सिडको वसाहतीसह २९ गावांचा समावेश करण्यात आला. महापालिका निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवली. पनवेलच्या विकासाच्या प्रश्नाकडे आमदार प्रशांत ठाकूर स्वतः लक्ष घालताना दिसत आहेत. नागरिकांना मूलभूत सुविधा कशा मिळतील यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. पनवेल महापालिका हद्दीत पाण्याचा तुटवडा निर्माण होता असल्याने त्यांनी शासनाकडून अमृत कुंभ योजना मंजूर करून आणली. त्याचे काम पूर्ण झाल्यावर पनवेलचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. महापालिकचे शासनाकडे प्रलंबित असलेले जीएसटी अनुदान मिळावे यासाठी अर्थमंत्री आणि मुख्यमंत्र्यांबरोबर बैठका घेऊन अनुदानाचा प्रश्न मार्गी लावण्यात यश मिळवले आहे. नैना प्रकल्प, नवी मुंबई विमानतळ विस्थापितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

सिडकोचे अध्यक्ष झाल्यावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या प्रकल्पग्रसतांच्या आंदोलनातील तुमचा एक सहकारी येथे अध्यक्ष म्हणून बसत आहे. त्यामुळे सर्वांच्या अपेक्षा आहेत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कालबद्ध पद्धतीने काम करणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शनाखाली महापालिका भवनाच्या जागेपासून, सिडको वसाहतीतील पाणीपुरवठा, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन समस्या, रोज बाजार, उद्यान, क्रीडांगण आणि समाजमंदिर यासाठी भूखंड यासारखे प्रश्न सिडकोच्या अडमुठेपणामुळे रखडले होत ते मार्गी लावले. सिडकोच्या घरांच्या पुनर्विकासाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित होता, तो पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावला आहे. याचा फायदा त्यांना निवडणुकीत निश्चितच होईल.

पनवेलमध्ये शेकाप आणि महाविकास आघाडीमध्ये अद्याप बेबनाव आहे. उबाठाचे नेते उद्धव ठाकरे यांना शेकापला जवळ करावयाचे नाही. त्यामुळे त्यांनी लीना गरड यांना उमेदवारी दिली आहे. पनवेलचा ग्रामीण भाग हा शेकापचा एकेकाळी बालेकिल्ला होता. आज पाहिले तर ग्रामीण भागात शेकापची अवस्था बिकट झाली आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपला मोठ्या प्रमाणात विजय मिळाल्याने त्यांची मक्तेदारी मोडीत निघाली आहे. पनवेल मतदारसंघात नोकरी धंद्यासाठी मोठ्या प्रमाणात स्थायिक झालेल्या कॉस्मोपोलिटिन समाजाची वस्ती वाढली आहे. हा समाज शेकापसारख्या प्रादेशिक पक्षाला मतदान करणे शक्य नसल्याचे अनेक निवडणुकीत दिसून आले आहे. नवीन मतदार होणार तरुणवर्ग प्रादेशिक पक्षाला मतदान करण्यापेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपलाच मतदान करेल.

महायुती सरकारने राज्यात अडीच वर्षात केलेली कामे आणि लाडकी बहीण, महिलांना एसटी मध्ये अर्धे तिकिट, ७५ वर्षे पूर्ण केलेल्यांना मोफत प्रवास आदी योजनांचा फायदा निश्चितच होणार आहे. पनवेल तालुक्यात आणि महापालिका हद्दीत अनेक शासकीय योजना राबवल्या त्यासाठी प्रशांत ठाकूर यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. शेतमजूर, शेतकरी आणि कामगारांचा पक्ष म्हणवणारा शेकाप आज रायगडमध्ये विकासाला फक्त विरोध करण्याचे काम करीत आहे. त्यामुळे नवीन उद्योग जिल्ह्यात येत नसल्याने बेरोजगारी वाढत आहे. अशावेळी या परिसरात जेएनपीटीच्या माध्यमातून दीड लाख नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत आज नवीन येणाऱ्या उद्योगात कुशल कामगाराची गरज असल्याने त्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी चांगा काना ठाकूर शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची सोय उपलब्ध करण्याचा प्रयत्न माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर करीत आहेत. त्याचा फायदा या निवडणुकीत होणार आहे.

भाजप हा शिस्तीने चालणारा पक्ष आहे. वर्षाचे १२ महीने पाच वर्षे काम करताना पक्षाचे बूथ प्रमुख, त्यामध्ये १० पन्ना प्रमुख आणि सहा बुथचा ग्रुप अशा संघटनात्मक पद्धतीने गावागावात जाऊन लोकांना शासनाच्या योजनांची माहिती दिली जाते. त्या योजना राबवण्याचे काम केले जाते. त्यामुळे शासनाचे निर्णय लोकांपर्यंत पोहचतात याचा परिणाम म्हणून राज्यात झालेल्या नगरपालिका आणि ग्रामपंचायत निवडणुकीत पक्षाला चांगले यश मिळाले. पनवेल विधानसभा मतदारसंघ शहरी आणि ग्रामीण असा विभागलेला आहे. भौगोलिक, आर्थिकदृष्ट्या या मतदार संघाचे महत्त्व आहे. गेल्या काही वर्षात या मतदारसंघात झपाट्याने बदल होत आहेत. २०१९ची निवडणूक भाजपसाठी सोपी ठरली होती. आताही महाविकास आघाडीच्या धरसोडपणामुळे भाजपचे पारडे जड दिसत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### बीएसएनएलचा एअरटेल आणि जिओ कंपनीला झटका

स्वस्त प्लॅन्समुळे अनेक युजर्स आता बीएसएनएलकडे वळत आहे. यामुळे भारती एअरटेल आणि रिलायन्स जिओने अनुक्रमे २४ लाख आणि सुमारे ४० लाख ग्राहक गमावले. बीएसएनएलने जुलैमध्ये सुमारे ३० लाख नवे ग्राहक मिळवले आहेत. यामुळे पुन्हा एकदा दूरसंचार क्षेत्रातील आपलं वर्चस्व कायम ठेवण्यात बीएसएनएल आगेकूच करत असल्याचं दिसतंय. अनेक ग्राहक बीएसएनएलशी जोडले गेले आहेत. याविषयी खाली विस्ताराने वाचा.




बीएसएनएलचे सिमकार्डही सहज उपलब्ध होणार आहे. त्यासाठी कंपनीने एटीएमसारखी मशिन बसविण्याची योजना आखली आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या इंडिया मोबाईल काँग्रेसमध्ये या मशिनचे प्रदर्शन करण्यात आले होते. यामुळे बीएसएनएल युजर्स या मशिन किंवा सेल्फ केअर ॲप्सच्या माध्यमातून सिमकार्ड घेऊ शकणार आहेत.

रेल्वे स्थानक, विमानतळासारख्या व्यस्त ठिकाणी ही व्हेंडिंग मशिन बसविण्यात येणार आहेत. यामुळे बीएसएनएलला ग्राहकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. ज्यांना बीएसएनएल कार्यालयात किंवा एक्स्चेंजमध्ये जायचे नाही त्यांच्यासाठी ही सिम वेंडिंग मशिन्स विशेष उपयुक्त ठरणार आहेत. बीएसएनएलने आपल्या मोबाईल नेटवर्कवरील स्पॅम कॉल ब्लॉक करण्याची योजना आखली आहे. स्पॅम कॉलचा सामना करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि मशीन लर्निंगशी (एमएल) संबंधित सोल्यूशन्सचा वापर केला जाईल. टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडियाने स्पॅम कॉलवर ही कडक कारवाई सुरू केली आहे.

बीएसएनएलनेही कमी किमतीच्या मोबाइल सेगमेंटमध्ये उतरण्याची तयारी केली आहे. कंपनीने कार्बन मोबाइल्ससोबत भागीदारी करून एक्सक्लुझिव्ह सिम हँडसेट बंडलिंग ऑफर आणली आहे. हे हँडसेट जिओ भारत ४G फीचर फोनला टक्कर देतील. यामुळे युजर्सला कंपनीची ४G सेवा वापरण्यासाठी महागडे स्मार्टफोन खरेदी करावे लागणार नाहीत.

बीएसएनएल युजर्स मशिन किंवा सेल्फ केअर ॲप्सच्या माध्यमातून सिमकार्ड घेऊ शकणार असल्याने युजर्सला ते सहज शक्य होणार आहे तसेच स्वस्त प्लॅन्सचाही लाभ घेता येईल.

# दिग्दर्शक आणि अभिनेते व्ही. शांताराम



**निमित्त**

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिभावंत निर्माता, दिग्दर्शक, नट व पटकथाकार व्ही. शांताराम संपूर्ण नाव शांताराम राजाराम वणकुद्रे यांचा जन्म कोल्हापूर येथे १८ नोव्हेंबर १९०१ झाला. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

व्ही. शांताराम यांच्या वडिलांचे किराणा मालाचे दुकान होते व कुटुंबाची आर्थिक स्थिती यथातथाच होती. त्यामुळे शालेय शिक्षण झाल्यावर सुरुवातीला त्यांनी अल्प वेतनावर नोकरी केली. अशा प्रतिकूल काळातच ते दादासाहेब फाळके यांचे चित्रपट, बालगंधर्वांची नाटके, भारतीय व पाश्चात्त्य संगीत अशा कलाक्षेत्रांकडे आकर्षित झाले आणि परिश्रम, कल्पकता व स्वयंप्रेरणा यांच्या बळावर शिकत जाऊन श्रेष्ठ दिग्दर्शक बनले. १९१४ साली त्यांनी बालगंधर्वांच्या 'गंधर्व नाटक मंडळी'त नट म्हणून प्रवेश केला. १९२० साली फाळके यांच्या पौराणिक मूकपटांच्या यशाने प्रेरित होऊन कोल्हापूरला प्रसिद्ध चित्रकार बाबूराव पेंटर यांनी स्थापलेल्या 'महाराष्ट्र फिल्म कंपनी'त ते सामील झाले. बाबूराव पेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रपट कलेची मूळाक्षरे तेथे त्यांनी गिरविली.

नेपथ्य, छायाचित्रण, संकलन, अभिनय, खास दृश्ये (स्पेशल इफेक्ट्स) अशा प्रत्येक शाखेतील बारकावे व्ही. शांताराम यांनी तेथे अभ्यासले. याच कंपनीत असताना बाबूराव पेंढारकर यांनी त्यांचे 'व्ही. शांताराम' असे चित्रपटीय नामकरण केले.

महाराष्ट्र फिल्म कंपनीने त्या काळात अनेक मूकपट काढले. त्यांपैकी सुरेखाहरण (१९२१) या पौराणिक मूकपटातील कृष्णाच्या भूमिकेद्वारे त्यांनी रूपेरी पडद्यावर प्रवेश केला. विशेषतः सावकारी पाश (१९२५) या सामाजिक वास्तवाचे अत्यंत प्रभावी चित्रण करणाऱ्या मूकपटाचा शांतारामबापूंवर सखोल परिणाम झाला. १९२९ साली कोल्हापूर येथे प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. या नव्या कंपनीमुळे भारतीय चित्रपटसृष्टीत एका सुवर्णयुगाला प्रारंभ झाला. या कंपनीने व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनाखाली गोपाळकृष्ण (१९२९), खुनी खंजर (१९३०), रानीसाहिबा (१९३०), उदयकाल (१९३०), जुलूम (१९३१), चंद्रसेना (१९३१) इ. पौराणिक व देमार (स्टंट) मूकपट निर्माण केले. १९३२ साली आयोध्येचा राजा हा मराठी (हिंदी अयोध्याका राजा) पहिला बोलपट निर्माण करण्यात आला. त्याचे संगीतदिग्दर्शक गोविंदराव टेंबे होते व प्रमुख भूमिका दुर्गा खोटे, बाबूराव पेंढारकर, मास्टर विनायक इ. नामवंत अभिनेत्यांनी केल्या होत्या. या बोलपटातील इंद्रदरबाराचे नेपथ्य अतिशय नेत्रदीपक होते.

भारतीय चित्रपटसृष्टीत 'बायपॅक' पद्धतीने तयार केलेला पहिला रंगीत बोलपट म्हणजे शांताराम दिग्दर्शित सैरंध्री (१९३३). १९३३ मध्ये 'प्रभात'चे स्थलांतर कोल्हापूरहून पुणे येथे झाले. अमृतमंथन (१९३४) या चित्रपटात व्ही. शांताराम यांनी आपले तांत्रिक कौशल्य सिद्ध केले.

व्ही. शांताराम यांच्या ठायी असलेल्या औदार्याचे व माणुसकीचे विलोभनीय दर्शनही काही प्रसंगांतून घडते. भारतीय चित्रपटाचे पितामह चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांचे उत्तरायुष्य अतिशय विपन्नावस्थेत गेले. त्या काळात व्ही. शांताराम यांनी आत्मीयतेने त्यांचा उदरनिर्वाह काही काळ चालविला. व्ही. शांताराम यांच्या आत्मचरित्रातील या दोघांचा पत्रव्यवहार हृदयद्रावक तर आहेत, परंतु समस्त कला क्षेत्रातील मान्यवरांना अंतर्मुखही करणारा आहे. या श्रेष्ठ चित्रपतीचे मुंबई येथे ३० ऑक्टोबर १९९० रोजी निधन झाले.

**(साभार : विकास पिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**




उरण : हातावर पोट असणारे विक्रेते दिवाळी सणानिमित्त पणत्या, रांगोळी तसेच सजावटीचे साहित्य विकत असतात.

## आरोग्य प्रहर

### सावधान! कॅन्सरबाधित रुग्णांची संख्या वाढतेय

बदलत्या जीवनशैलीमुळे शरीराची होणारी ससेहोलपट लक्षात येत नाही. जंकफूडचे सेवन, वाढता - लठ्ठपणा, व्यसनाधीनता यामुळे दिवसेंदिवस कॅन्सरबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. जगात २८.२ टक्के महिलांना दरवर्षी ब्रेस्ट कॅन्सर होतो.



कॅन्सरतज्ज्ञ डॉ. रेश्मा पवार यांनी सांगितले की, भारतात एक लाख महिलांमधील २६ महिला ब्रेस्ट कॅन्सरने त्रस्त आहेत. ग्रामीण भागात ६६ टक्के व शहरात ८ टक्के महिला ब्रेस्ट कॅन्सरग्रस्त आढळतात. या आजारामुळे १२.७ टक्के रुग्णांचा मृत्यू होत असल्याची माहिती कॅन्सर तज्ज्ञ डॉ. रेश्मा पवार यांनी दिली.

दहा ते पंधरा वर्षांपूर्वी कॅन्सर हा पन्नास किंवा साठीकडे झुकलेल्या नागरिकांमध्ये आढळायचा; पण सध्या हा आजार २५ ते ५० वयोगटातील महिलांमध्ये सर्वाधिक आहे. बदलत्या जीवशैलीबरोबर उशिरा लग्न, मूल न होणे, दीर्घकाळ स्तनपान न देणे, चरबीत वाढ, व्यसनाधीनता, आनुवंशिकता आदी कारणे आहेत.

वेळेत उपचार घेतल्यास ६० टक्के कॅन्सर टाळता येतो. मात्र, अजूनही ४० टक्के कॅन्सरची कारणे सापडलेली नाहीत. त्याबाबत संशोधन सुरू आहे. अहवालानुसार, स्तनाचा कर्करोग महिलांमध्ये १४ टक्के आहे.

परंतु, २० वर्षांपेक्षा कमी वयाच्या तरुणांमध्ये त्याचे प्रमाण खूप जास्त आहे. स्तनातील गाठी सौम्य असतात. ज्या फायब्रोएडेनोमा किंवा सिस्टसारख्या परिस्थितीमुळे होतात. नॅशनल कॅन्सर रेजिस्ट्री प्रोग्रामच्या आकडेवारीनुसार, ३० वर्षांनंतर स्तन कर्करोगाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.

आनुवंशिकता, हार्मोनल बदल कारणीभूत

जर कौटुंबिक सदस्य विशेषतः आई, बहीण किंवा आजी यांना लहान वयात काही जनुक उत्परिवर्तन, जसे की, बीआरसीए १ आणि बीआरसीए २ वाढलेल्या जोखमीशी संबंधित असल्यास किंवा हार्मोनल इफेक्टस्मुळेही स्तनाच्या कॅन्सरचा धोका वाढू शकतो. स्तनाग्रातून स्ट्रेचिंग, असामान्य किंवा रक्तस्राव आणि स्तनामध्ये अचानक बदल झाला असेल, तर त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा. स्तनाची स्व-परीक्षा ओळखून वेळेत तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. ब्रेस्ट कॅन्सर गेल्या दहा वर्षांपासून झापाट्याने वाढत आहे.

# आमदार गोगावले लाखांच्या फरकाने निवडून येणार

## रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांचा विश्वास; भरतशेठ यांचा अर्ज दाखल

**महाड : प्रतिनिधी**

भरत गोगावले हे परत परत नाही तर महाडचे आमदार कायम तेच असतील. या वेळीदेखील ते लाखांच्या फरकाने निवडून येतील, असा दावा पालकमंत्री उदय सामंत यांनी केला.

जोरदार शक्तिप्रदर्शन करीत मंगळवारी (दि.२९) महायुतीचे उमेदवार आमदार भरत गोगावले यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. शहरातून भव्य रॅलीदेखील काढण्यात आली. यानंतर झालेल्या सभेत ते बोलत होते.

शहरातून घोषणाबाजी करीत भव्य रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सभा घेण्यात आली. या सभेला पालकमंत्री उदय सामंत, खासदार सुनील तटकरे, आमदार प्रवीण दरेकर, भरत गोगावले, माजी आमदार अनिकेत तटकरे, विकास गोगावले, बिपीन महामुणकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पालकमंत्री उदय सामंत पुढे म्हणाले की, सुभाष देसाई उद्योगमंत्री असताना एकही उद्योग महाडमध्ये आणू शकले नाहीत, मात्र आमच्या काळात उद्योगही आले आणि रोजगारही निर्माण झाले, असा घणाघात त्यांनी केला.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी, तालुक्यामध्ये गेली १५वर्षे आमदार गोगावले यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामांसाठी निधी उपलब्ध केला हे कौतुकास्पद असल्याचे स्पष्ट केले, तर आमदार प्रवीण दरेकर यांनीदेखील, निवडून आले आमच्यासोबत आणि बसले काँग्रेससोबत, मग सांगा गद्दार कोण? असा सवाल केला.

आमदार भरत गोगावले यांनी गेल्या १५ वर्षांमध्ये केलेल्या कामांचा आढावा घेत महाड एमआयडीसीमध्ये आपण अनेक तरुणांना कायमस्वरूपी नोकऱ्या दिल्या आहेत. माझ्या घराचे दरवाजे जनतेसाठी कायम उघडे असतात. आपण प्रचंड विकासकामे केली आहेत. त्यामुळे विरोधकांना प्रचारासाठी कोणता मुद्दाच उरलेला नाही, असेदेखील सांगितले.




# ‘आरसीएफ’तर्फे उपविभाग पोलीस कार्यालयाला संगणक

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) थळतर्फे उपविभागीय पोलीस अधीक्षक कार्यालय येथे दोन संगणक मंगळवारी (दि.२९) देण्यात आले.

निवडणुकांच्या अनुषंगाने वाढीव दैनंदिन कामकाजाची पूर्तता करण्यासाठी अलिबाग पोलीस ठाण्याला संगणकांची आवश्यकता होती. यासाठी विनंतीपत्र पोलीस ठाणेतर्फे



आरसीएफला प्राप्त झाले. आरसीएफ व्यवस्थापनाने तातडीने दोन संगणक अलिबाग पोलीस ठाण्यासाठी उपलब्ध करून दिले. याबद्दल उपविभागीय पोलीस अधीक्षक विनीत चौधरी यांनी समाधान व्यक्त करून आरसीएफ व्यवस्थापना प्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

# सोशल मीडियावर करडी नजर

## आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांविरोधात होणार गुन्हा दाखल

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूक काळात समाजमाध्यमांवर कुठलीही पोस्ट करताना अथवा प्रतिक्रिया देताना तसेच पक्षाचा अथवा उमेदवारांचा प्रचार करताना प्रत्येकाने सावधगिरी बाळगावी. सोशल मीडियावर आचारसंहिता काळात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर निवडणूक आयोगाची करडी नजर असणार असून अशी पोस्ट करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

विधानसभा निवडणूक २०२४करीता आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोशल मीडियावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या काळात फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, गुगल, शेअरचॅट, टिकटॉक, बिग टीव्ही यांसारख्या माध्यमातून खोटी माहिती देणे, अफवा पसरवणे, सोशल मीडियावर चुकीच्या पद्धतीने माहिती पोस्ट करणे आदी प्रकार केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. निवडणूक काळात समाजमाध्यमांचा चुकीचा वापर करू नये, असे आवाहन घार्गे यांनी केले आहे.

या काळात तसेच भविष्यातदेखील सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारा मजकूर, फोटो पोस्ट करू नयेत. देशाची एकता-सार्वभौमत्व आदींचे नुकसान करणारा, कोणत्याही संप्रदाय विरोधातला मजकूर, अफवा पसरविणारा, जीवे मारण्याची धमकी देणारा, अश्लील कंटेंट, चाइल्ड पोर्नोग्राफी आदी पोस्ट करणारा आणि ती पोस्ट शेअर करणारा अशा दोघांनाही दोषी ठरविले जाते. यापैकी काही गुन्ह्यांसाठी तुरुंगवास, सायबर क्राईमसाठी तीन वर्षे ते आजीवन कारावास तसेच एक लाख ते १० लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो, असेही घार्गे यांनी स्पष्ट केले आहे.

# वाचनालयात दिवाळी पहाट

**मुरूड : प्रतिनिधी**

सार्वजनिक वाचनालयात दरवर्षीप्रमाणे गुरुवारी (दि.३१) पहाटे ६ वा. स्थानिक कलावंताच्या कलाविष्कारातून संगीत दीपोत्सव या विविधरंगी कार्यक्रमाने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक वाचनालयाच्या उपाध्यक्षा दिपाली जोशी यांनी दिली आहे.

स्थानिक कलाकारांना दाद देण्याकरीता सर्व रसिकांनी आवर्जुन उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी सार्वजनिक वाचनालयातर्फे करण्यात येत असते.

# विद्यार्थ्यांनी घेतली फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील राजिप शाळा सिद्धेश्वरमधील सर्व विद्यार्थ्यांनी फटाके न वाजविण्याची शपथ घेतली. हे विद्यार्थी फटक्याऐवजी गोष्टी पुस्तके खरेदी करणार आहेत.

आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांनी पर्यावरणस्नेही आकाशकंदीलसुद्धा तयार केले. या वेळी केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे, मुख्याध्यापिका रोहिणी खामकर, शिक्षक जनार्दन भिलारे, स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे होणारे दुष्परिणाम व फटाकेमुक्त दिवाळीचे महत्त्व समजावून सांगितले.

पर्यावरणस्नेही दीपावली, फटाकेमुक्त दीपावली साजरी करू, तसेच या दिवाळीत फटाके फोडणार नाही. त्याऐवजी पुस्तके विकत घेऊन वाचू, अशी शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांना मदतीचा हात



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील विविध गावातील तरुणांनी पोलीस भरती परीक्षा पूर्वतयारीसाठी लागणारी पुस्तके आणि स्पोर्ट्स ॲक्टिव्हिटीचे साहित्य आम्हाला द्यावे, अशी मागणी सुनील गोगटे यांच्याकडे केली होती. त्यानुसार या तरुणांना साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

प्रसाद मसणे, तुषार कोळंबे, प्रथमेश मसणे, सुजल बार्शी, प्रफुल मसणे, कल्पेश मसणे, हरेश माळी, रोशन माळी, जयेंद्र मसणे, मयूर माळी, जय सोनावणे, संकेत धुळे, आकाश कराळे, निलेश मसणे, रोशन दुर्गे, प्रणव मसणे, प्रतिक माळी, रोशन निकाळजे, दीपक भोसले, ओमकार गुरव, शुभम आदी तरुणांना सुनील गोगटे यांच्या माध्यमातून क्रीडा साहित्य आणि पुस्तके देण्यात आली.

या वेळी मिनेश मसणे, रोशन पाटील, राजेंद्र जंगम, सर्वेश गोगटे आणि गणेश गवई आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **विलास परशुराम पाटील, विजय परशुराम पाटील, नितीन मनोहर पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे : सारडे (५५३३४३)
(PU-ID २८६४०५०००७२), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १५९/२<br>खाते क्रमांक : २४१ | १ | ०.४८.००<br>पो.ख. ०.०६.०० | ७.३१ |
| | | एकुण ०.५४.०० | |
| एकुण क्षेत्र ०.५४.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ३०/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **सत्यवान लक्ष्मण पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन मौजे : वशेणी (५५३३४३)
(PU-ID १५०९३८७२६४१), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९०/१/अ<br>खाते क्रमांक : ३७८ | १ | ०.१७.९०<br>पो.ख. ०.०३.३० | ४.२५ |
| | | एकुण ०.२१.०० | |
| एकुण क्षेत्र ०.२१.२० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ३०/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **चंद्रशेखर छगन पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन मौजेः वशेणी (५५३३४४)
(PU-ID १५३५९५०७२५५), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८७/४/ब<br>खाते क्रमांक : ७४९ | १ | ०.१७.१०<br>पो.ख. ०.००.८० | ४.०० |
| | | एकुण ०.१७.९० | |
| एकुण क्षेत्र ०.१७.९० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ३०/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **रामचंद्र विठ्ठल गायकवाड** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन मौजेः सारडे (५५३३४३)
(PU-ID १५०६१७७९५२८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १८२/२<br>खाते क्रमांक १०२७ | १ | ०.२०.००<br>पो.ख. ०.०१.०० | ४.५० |
| | | एकुण ०.२१.०० | |
| एकुण क्षेत्र ०.२१.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ३०/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **जगदिश शांताराम म्हात्रे व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन मौजेः सारडे (५५३३४३)
(PU-ID २८४९५१३०४८४), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०४/४<br>खाते क्रमांक : ४८६ | १ | ०.२८.५०<br>पो.ख. ०.०२.५० | ६.६९ |
| | | एकुण ०.३१.०० | |
| एकुण क्षेत्र ०.३१.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ३०/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
**बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - करवले बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | भोगवटादार | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| ७० | ३/अ | १ | ०- ४०-००<br>पो. ख. ०- ००-०० | १.०४ | मे. महावीर इम्पेक्स तर्फे भागीदार श्री. मोहनीश ओमप्रकाश छाजेर |
| | | | एकूण ०-४०-०० | | |

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड, जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**

पत्ता :- शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्पेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## उरण नगरपरिषद उरण

**ता. उरण, जिल्हा रायगड, पिन कोड - ४००७०२**

Email ID : uranmunicipal@gmail.com    दूरध्वनी क्रमांक : ०२२२७२२२३२०

जा.क्र.उपन/आरोग्य विभाग/ ६०७१/२०२४/२५    दिनांक : २९/१०/२०२४

**जाहीर आवाहन**
**(माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियाना अंतर्गत जाहीर आवाहन)**

- उरण नगरपरिषद क्षेत्रातील सर्व फटाके विक्रीदार / व्यावसायिक व फटाके विकत घेणारे ग्राहक यांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसूचना क्रमांक G. S. R. ६८२ (E). D ८.५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.
- महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लास्टिक मुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरण पूरक दिवाळी उत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा, प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा तसेच टाकाऊ वस्तूचा व पुनःवापर करण्यायोग्य वस्तूचा वापर जास्तीत जास्त करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
- मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटक्यांमध्ये Barium Salt, Lithium, Arsenic, Lead, Mercury या सारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे.
- फटाक्यांची विक्री नगरपरिषदेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच करण्यात यावी.
- मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल PII No. ३ / २०२३ मध्ये संध्या. ७:०० ते रात्री १०.०० या वेळेत फटाके फोडण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याचे पालन करण्यात यावे.
- नागरिकांनी आपल्या सोसायटीमधील फटाक्यांचा कचरा वेगळा गोळा करून सफाई कर्मचारी यांच्याकडे देण्यात यावा. जेणेकरून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यास मदत होईल.

येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करूया. तसेच हि दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

**सही/-**
**(श्री. समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद , उरण**

## रोहा अष्टमी नगर परिषद

**ता-रोहा, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०२ १०९**
**फोनः- कार्यालय-०२१९४ २३५७३७**
Email: rohanagarpalika@gmail.com

जा क्र. रोनप/आरोग्य/११०७/२०२४-२०२५    दिनांक : २९/१०/२०२४

**जाहीर आवाहन**
**अवैध फटका साठवणूक व विक्री तसेच प्रतिबंधित फटाके विक्रीबाबत**

स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत शहरामध्ये विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानांतर्गत शहरामध्ये फटाकेमुक्त, प्लास्टिकमुक्त, कचरामुक्त व पर्यावरणपूरक हरित सण व उत्सव साजरे करावयाचे आहेत, त्याअनुषंगाने सर्व फटाके विक्रेत्यांना सुचित करण्यात येते की,

१. शासन निर्णय परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२० सी-१८६/पोल-९ दिनांक ०६ नोव्हेंबर २०२० नुसार प्रतिबंधित केलेल्या फटाक्यांची विक्री आपणास करता येणार नाही.
२. शासन निर्णय क्र. याचिका-२०१६/प्र.क्र. ४३२/नवि-२० दिनांक ०५ नोव्हेंबर २०१६ चे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी फटाके विक्रेत्यांची राहील, याची नोंद घ्यावी.
३. भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.६८२ (E), dt ५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (A1) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.
४. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथियम, अर्सेनिक, लीड, मक्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे.

**सण, समारंभ व उत्सव साजरा करताना खालील सूचनांचे पालन करावे :**

- सण व उत्सवांमध्ये (दीपावली, महापुरुष जयंती, गणेशोत्सव, मिरवणूक, यात्रा, इतर समारंभ) वापरण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण तसेच हानिकारक वायू निघाल्याने वायू प्रदूषण होते हे पर्यावरणास व मानवी आरोग्यास हानीकारक आहे. त्यामुळे फटाकेमुक्त व प्रदूषणमुक्त सण व उत्सव साजरे करावे.
- सण व उत्सवांमध्ये प्लास्टिकचा वापर टाळून कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा.
- सण व उत्सवांमध्ये सुशोभिकरण करण्याकरिता प्लास्टिक विरहीत वस्तूंचा वापर करावा व जास्तीत जास्त झाडे लावून पर्यावरणपूरक सण साजरा करण्यावर भर द्यावा.
- घरामध्ये तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे घरगुती कंपोस्ट खत तयार करण्यावर भर देऊन त्या खताचा उपयोग आपल्या घराभोवतीच्या परसबागेत करावा.

शहरामध्ये प्रदूषण होणार नाही यासाठी प्रदूषणमुक्त, फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक सण व उत्सव (दीपावली, जयंती, गणेशोत्सव, मिरवणूक, यात्रा, इतर समारंभ) साजरा करावा व माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये सहभागी होऊन नगर परिषदेस सहकार्य करावे. तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करुया. तसेच आगामी येणारे सण व उत्सव (दीपावली, महापुरुष जयंती, गणेशोत्सव, मिरवणूक, यात्रा, इतर समारंभ) आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!!

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगरपरिषद, रोहा**

# दिवाळीनिमित्त स्वच्छता कार्य

## नवी मुंबईत मुख्य रस्ते साफसफाई | नागरिकांकडून समाधान

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळीपूर्वी शहर स्वच्छतेची विशेष सखोल स्वच्छता मोहीम आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून शहरातील मुख्य मार्गांवर साफसफाई करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.





दुभाजकांचे कॉर्नर्स व पदपथ येथील गाळ सुकून झालेली माती काळजीपूर्वक साफ करण्यात येत आहे. याकरिता मॅकेनिकल स्विपींग वाहने तसेच वॉटर स्प्रेईंग वाहने यांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. यामध्ये अग्निशमन विभागाचेही विशेष सहकार्य मिळत आहे. पावसाळी कालावधीत पावसासोबत वाहून आलेली माती रस्त्यांच्या कडेला गाळ स्वरुपात जमा होते व पाऊस थांबल्यानंतर वाहनांच्या रहदारीमुळे हवेत उडून प्रदूषणात वाढ होते. ही बाब लक्षात घेत ही रस्त्यांच्या कडेला साचलेली माती जमा करण्यात येत असून त्यानंतर या रस्त्यांची जेटींग मशीनद्वारे पाणी मारुन सफाई करण्यात येत आहे. यासाठी वापरण्यात येणारे पाणी मलप्रक्रिया केंद्रातील शुध्दीकरण केलेले प्रक्रियाकृत पाणी असून यामुळे रस्ते सफाईसोबतच पिण्याच्या पाण्याची बचतही केली जात आहे.

या अंतर्गत नेरुळ विभागात राजीव गांधी उड्डाणपूल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते से ३ बस डेपो – जय भवानी सर्कलपर्यंत रस्ते स्वच्छता व रस्ते धुणे अशा दोन्ही प्रकारे विशेष स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे अवजड वाहनांची नियमित वर्दळ असणाऱ्या बेलापूरमधील आम्रमार्गावर उरण फाटा ते नमुंमपा मुख्यालय भागाची रस्ते सफाई करण्यात आली.

यासोबतच ठाणे बेलापूर मार्ग, कोपरखैरणे–रबाळे एमआयडीसी मार्ग, महापे शिळफाटा मार्ग, वाशी कोपरखैरणे मार्ग, घणसोली पामबीच मार्ग, पटणी मार्ग अशा मुख्य मार्गांची रस्ते साफसफाई व धुणे अशा दोन्ही प्रकारे सखोल स्वच्छता करण्यात आली आहे. या भागात दररोज सकाळ, संध्याकाळ चालण्यासाठी येणाऱ्या महिला व पुरुषांनी महानगरपालिकेच्या या सखोल स्वच्छता मोहिमेची प्रशंसा केली असून यामुळे धुळीचे प्रमाण कमी झाल्याचे अभिप्राय दिले आहेत.

शहरातील महामार्ग व मुख्य रस्ते तसेच शहराच्या अंतर्गत भागातील प्रमुख रस्ते यांच्या कडेची माती साफसफाई करुन व रस्ते प्रक्रियाकृत पाण्याने धुवून वायू प्रदूषणाला प्रतिबंध करण्यात येत आहे. नागरिकांनीही पर्यावरणशील दृष्टीकोन दाखवत दिवाळीच्या सजावट साहित्यात प्लास्टिकचा वापर टाळून कागद, कापड अशा पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा तसेच प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करावा, असेही आवाहन करण्यात आलेले आहे.

> **स्वच्छता हीच लक्ष्मी ही भारतीय संस्कृतीची शिकवण असून नवी मुंबईकर नागरिकांनी फटाकेमुक्त, प्लास्टिकमुक्त, स्वच्छ, सुंदर, पर्यावरणशील दिवाळी साजरी करावी.**
> **–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# उरण एनएमएमटी बससेवा पूर्ववत करण्याची मागणी

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**



गेल्या आठ महिन्यांपासून उरणमधील नवी मुंबई महापालिकेची एनएमएमटी बससेवा बंद आहे. त्यामुळे ही सेवा पूर्ववत करावी, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

उरणमधील प्रवाशांची जीवनरेखा असलेली नवी मुंबई महानगरपालिकेची एनएमएमटी बससेवा बंद आहे त्यामुळे येथील ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. प्रवाशांची होणारी ही गैरसोय थांबवी. यासाठी नवी मुंबई महापालिका आयुक्तांना साकडे घातले आहे. मात्र अद्याप बस सेवा सुरू न झाल्याने पुन्हा एकदा ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांनी आर्त साद घातली आहे. एनएमएमटीमधून उरण नवी मुंबई असा दररोज आठ ते दहा हजार प्रवासी प्रवास करीत होते. ही सेवा पूर्व सुरू करण्याच्या मागणीसाठी किसान सभा, मॉर्निंग कट्टाच्या ज्येष्ठ नागरिकांनी पुढाकार घेत सह्यांची मोहीम सुरू केली आहे.

या मोहिमेला सर्व स्तरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे. या सह्यांचे निवेदन दिल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी सेवा पूर्ववत करण्याचे आश्वासन दिले आहे.

फेब्रुवारीमध्ये खोपटे येथे झालेल्या भीषण अपघातानंतर नवी मुंबईसाठी प्रवाशांची जीवनरेखा ठरलेलीय महानगरपालिकेची एनएमएमटी बस सेवा व्यवस्थापनाने कामगारांची सुरक्षा आणि तोट्यात चालणारा मार्ग ठरवून अनिश्चित काळासाठी बंद केली आहे. याचा फटका उरणच्या प्रवाशांना बसत आहे. यामध्ये विशेषता ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी व कामगार यांच्यासह सर्व सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

# एसटी बसमध्ये चढताना मंगळसूत्र चोरले

**पनवेल :** एसटी बस स्टँडमधील बसमध्ये चढत असताना ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरल्या प्रकरणी चोराविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पुष्पा धनावत ह्या रसायनी, खालापूर येथे राहत असून त्या व त्यांचे पती चष्म दुरुस्त करण्यासाठी रसायनी येथून एसटी बसने पनवेल येथे आल्या. ओरियन मॉल येथे चष्म्याचे काम करून दोघे रसायनीला जाण्यासाठी दुपारी एसटी स्टँडवर आल्या आणि वाशीवली येथे जाणाऱ्या बसमध्ये चढले. यावेळी गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र नसल्याचे दिसून आले. त्यांनी आजूबाजूला मंगळसूत्राचा शोध घेतला. अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याची वाटी असलेले सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले.

बस स्थानकात एसटीमध्ये चढताना अनेक महिलांच्या दागिने यापूर्वीदेखील चोरीला गेलेले आहेत. त्यामुळे पोलिसांनी या ठिकाणी गस्त वाढविण्याची मागणी करण्यात येत आहे.

# अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोटरसायकलला डंपर ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात प्रथम विलास म्हात्रे (वय २३ राहणार आरसीएफ रोड चेंबूर) आणि साक्षी सुभाष जाधव (वय १९, रा. पनवेल) या दोघांचा मृत्यू झाला. या प्रकरणी डंपर ट्रक क्रमांक एम एच ४६ एएफ ३२६८ वरील चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.




२६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास पळस्पे ते जेएनपिटीकडे जाणाऱ्या हायवेवरील टी पॉइंट जंक्शनच्या सर्विस रोडवर ब्रिजच्या जवळ प्रथम म्हात्रे हा हिरो एक्स्ट्रीम गाडी क्रमांक एम एच ०१ ईटी ८४७९ घेऊन जात होता. या वेळी पाठीमागे साक्षी जाधव बसली होती. डंपर ट्रक (एमएच ४६ एएफ ३२६८) वरील चालकाने डंपर बेदरकारपणे आणि हयघईने चालवून मोटरसायकलला ठोकर मारली. झालेल्या अपघातात प्रथम विलास म्हात्रे आणि त्याची मैत्रीण साक्षी सुभाष जाधव यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात डंपर ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त प्रतिज्ञा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केल्यानुसार नगरविकास विभागाच्या परिपत्रकानुसार २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा होत आहे.

'सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्रसमृध्दी' या संकल्पनेनुसार 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्ये आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांच्या समवेत विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी मुख्यालयातील म्फीथिएटर येथे भ्रष्टाचार निर्मूलनाची सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली.



या वेळी सुरुवातीला दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री.सी.पी राधाकृष्णन यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. या वेळी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सजग नागरिक आणि जबाबदार अधिकारी या दोन्ही भूमिका पार पाडताना कार्यपध्दतीत सुधारणा, कर्तव्यनिष्ठा व सचोटी राखली आणि आत्मचिंतन करुन शासकिय कामकाज, दैनंदिन व्यवहार व वर्तणूक यामध्ये सुधारणा केली तर त्याचा फायदा संस्था तसेच समाजाला होईल, असे मत व्यक्त केले. दक्षता जनजागृती सप्ताह आपल्याला जबाबदार अधिकारी व शासकिय प्रतिनिधी म्हणून कर्तव्य पार पाडण्याची जाणीव करुन देणारा असल्याचे सांगत त्यानुसार आपण नियमितपणे वर्तणूक ठेवली पाहिजे असेही आयुक्त म्हणाले.

'आपल्या देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा प्रमुख अडथळा आहे. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी सरकार, नागरिक आणि खाजगी क्षेत्र या सर्व घटकांनी संघटितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाने दक्ष राहायला पाहिजे आणि सदैव प्रामाणिकपणा व सचोटी यांच्या उच्चतम मानकांप्रती वचनबध्द असायला हवे आणि भ्रष्टाचाराविरुध्द लढा देण्यासाठी साथ दिली पाहिजे याची मला जाणीव आहे. म्हणून मी प्रतिज्ञा घेतो की, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणाने आणि पारदर्शक पद्धतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन, व्यक्तिगत वागणुकीत सचोटी दाखवून उदाहरण घालून देईन, भ्रष्टाचाराच्या कोणत्याही घटनेची माहिती योग्य अभिकरणास देईन, अशा शब्दांतील सामुहिक शपथ ग्रहण करण्यात आली.

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोने बेकायदा बांधकामांच्याविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. विशेष म्हणजे गेल्या पंधरा दिवसांत नवी मुंबईसह पनवेल आणि नैना क्षेत्रातील जवळपास ४० बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. यात चार ते पाच मजल्यापर्यंतच्या अनधिकृत इमारतींचा समावेश आहे.

निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सध्या कोणताही निवास नसलेल्या अनधिकृत इमारतीवर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. त्यामुळे भूमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

शहरात अनधिकृत बांधकामांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यानुसार काही महिन्यांपासून सिडकोचा अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग सक्रिय झाल्याचे दिसून येते. विशेषतः ४० बांधकामांवर कारवाई केली आहे.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे प्रमुख तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी विरकर यांच्या निर्देशानुसार मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविली जात आहे. विनापरवाना बांधकामांविरोधातील कारवाई मोहीम येत्या काळात अधिक तीव्र केली जाणार असल्याचे संकेत संबंधित विभागाने दिले आहेत. त्यामुळे भूमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

घणसोलीतील तळवली येथे सुरू असलेल्या सुमारे १५० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावरील बांधकामांवर शनिवारी कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे गोठीवली येथील सुमारे २०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर विनापरवाना सुरू असलेल्या बांधकामांवर हातोडा मारण्यात आला.




**पनवेल : कापड बाजार येथील ज्येष्ठराज सिद्धीविनायक मंदिरात दर्शन घेऊन महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रभाग १८मधील प्रचाराचा शुभारंभ माजी नगरसेवक डी.आर.भोईर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या वेळी प्रभागातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# दिवाळीनिमित्त ऐरोली शिव कॉलनी येथे विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी सण घरोघरी उत्साहात साजरा होत असताना विविध उपक्रमांच्या माध्यमातून समुहासह हा सण एकत्रितपणे साजरा करण्याची परंपराही मनापासून जोपासली जात आहे. नवी मुंबईत ऐरोली रहिवासी सेवा संघ युवा गट शिव कॉलनी यांच्या वतीने दिवाळी सणाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या अंतर्गत ३० ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत शिवकॉलनीतील रहिवाशांकरिता रांगोळी आणि किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रांगोळी स्पर्धेमध्ये १५ वर्षाखालील लहान गट आणि १५ वर्षावरील खुला गट असे दोन गट असून प्रत्येक गटासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय अशी तीन पारितोषिके आणि पाच उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. कोणताही रांगोळी प्रकार या स्पर्धेंतर्गत समाविष्ट असेल. किल्ला स्पर्धेकरिता सहा जणांच्या समूहाने किल्ला बनविणे अपेक्षित असून ३३३३ रुपये, २२२२ रुपये, ११११ रुपये अशी तीन पारितोषिके व ५५५ रुपये रक्कमेची तीन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास मानाचे फिरते गौरवचिन्हदेखील प्रदान करण्यात येणार आहे.

दिवाळी सणाच्या निमित्ताने २ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वा. शिव कॉलनीत प्रथमच दिवाळी पहाट या सुरेल संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले असून स्वरगंधा संगीत विद्यालयाचे कलावंत ही स्वरप्रभात सजवणार आहेत.

याशिवाय दिवाळी सणाचे आकर्षण म्हणजे शिवशंभू विचार मंच यांच्या माध्यमातून २ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत ऐरोली रहिवासी सेवा संघाच्या शिवकॉलनी कार्यालयात शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच २ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६.३० वा. स्पर्धांचा बक्षीस समारंभ संपन्न होणार आहे.

दिवाळी सणाच्या माध्यमातून सर्व रहिवाशांनी एकत्र येऊन आनंदाने दिवाळी साजरी करावी या उद्देशाने शिव कॉलनीतील युवकांनी एकत्र येत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असेही आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

# फणसवाडी येथे दिवाळीचा फराळ वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

भजनयात्री हंसारामबुवा नेरूळकर प्रतिष्ठानच्या वतीने व अमृत पाटील नेरुळकर यांच्या विशेष पुढाकाराने सोमवारी फणसवाडी (खारघर) येथे अन्नदान, साडीचोळी व दिवाळीचा फराळ वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी व्यासपीठावर प्रा. एल. बी. पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रा. डॉ. हरिश्चंद्र सिंह, मदन घेघाटे, मारुती म्हात्रे, नारायण पाटील, रामचंद्र म्हात्रे, शकुंतला म्हात्रे, अरुणा पाटील, ज्ञानेश्वर भोर, कल्पेश पाटील, मंगेश डुबे, पद्माकर वैती, सुरेश ठाकूर, शुभम म्हात्रे, रघुनाथ पारधी आदी मान्यवर उपस्थित होते.

माणसाने कितीही पदव्या संपादन केल्या आणि तो कितीही मोठा झाला तरी त्याच्यातील माणूसपण हे मोठे असून ते अधोरेखित होणे गरजेचे असते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून हा अनुभव येथे घेत आल्याने अगदी मनापासून आनंद झाल्याचे सांगून सामाजिक कार्यकर्ते प्रा. डॉ. हरिश्चंद्र सिंह यांनी या वेळी आदिवासी हा खरा भूमिपुत्र असून तो प्रवाहात सामावला जावा यासाठी कला शिक्षक अमृत पाटील आणि त्यांचे कुटुंबिय करीत असलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

आपण जेव्हा आपल्या मुला–बाळांसोबत खरेदी करण्यात, सुगंधी उटणे, खमंग फराळ, भारी कपडे आणि फटाके फोडून मस्त दिवाळी साजरी करण्यात मग्न असतो त्या वेळी अमृत पाटील नेरुळकर यांच्या सारखा एक कला शिक्षक आपल्या परिवाराला घेऊन दऱ्या–खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी बांधवांची दिवाळी गोड करण्यासाठी धडपडत असतो. त्यांची ही धडपड केवळ धडपड नसून खरी देवपूजा असल्याची भावना या वेळी सामाजिक कार्यकर्ते मदन घेघाटे यांनी व्यक्त केली.

या वेळी भाऊबीज भेट या उपक्रमांतर्गत फणसवाडी येथील ४० महिलांना साडी चोळी व दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. बच्चेकंपनीला फटाके, बिस्किटं तर संपूर्ण वाडीला पुरण पोळीचे भोजन देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अथर्व पाटील यांनी केले, तर आदिती पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मृत महिलेच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात जखमी झालेल्या महिलेचा पनवेल उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

पोलीस या मयत महिच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. मयत महिलेचे वय अंदाजे २५ वर्षे, उंची पाच फूट, अंगाने सडपातळ, रंग गोरा, चेहरा उभट, नाक सरळ बारिक, केस काळे लांब वाढलेला आहे. अंगात पिवळ्या, गुलाबी व राखाडी रंगाचा टॉप, पिवळी ओढणी आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (९८०७६१४८७६) यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले होते.

# उरण तालुक्यात भातपिकांची कापणी, मळणी वेगात

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील अनेक गावातील भातशेतीच्या कापणीला सुरुवात झाली असून शेतकऱ्यांना परतीच्या पावसाचा भरवसा नसल्याने कापणी आणि मळणी एकाचवेळी शेतात उरकून भात घरी नेले जात आहे. शेतात आलेले पीक हाती लागावं यासाठी उरण मधील शेतकऱ्यांची ही लगबग सुरू झाली आहे.



साधारणपणे सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात भात पिके तयार होतात. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात भात पिकांची कापणी सुरु केली जाते. भाताचे हे कापलेले पीक शेतात ठेवले जाते. याकाळात हे पीक उन्हात सुकत आणि त्यानंतर या पिकांची एकत्रित साठवण करून त्याची त्यानंतर दिवाळी किंवा त्यापुढे सवडीने मळणी केली जाते, मात्र सध्या पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना हातातोंडाशी आलेले भात पीक गमवावे लागत आहे. यावर्षी तर परतीचा पाऊस कधी येईल याची शाश्वती नाही. तसेच हल्ली वर्षभरात कधी आणि कोणत्याही वेळी पाऊस येत असल्याने शेतकऱ्यांनी हा मार्ग निवडला आहे. त्यातच शेतीचा वाढता खर्च, मजुरांची कमतरता यामुळे शेतकऱ्यांनी मधला मार्ग शोधला आहे.

यात पीक कापून ते तातडीने शेतातच तात्पुरता खळा तयार करून झोडून, पाखरून पिशवीत भरून घरी नेला जात आहे. त्यानंतर घरी हे भात पुन्हा उन्हात वाळत घातले जाते. त्यामुळे पिकांचे किमान नुकसान होत नसल्याची माहिती कमलाकर पाटील या शेतकऱ्यांनी दिली आहे.

# रायगडात ३,३९८ भावी शिक्षक देणार पात्रता परीक्षा

## तीन केंद्रांवर परीक्षेचे नियोजन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत १० नोव्हेंबर रोजी शिक्षक पात्रता परिक्षा जिल्ह्यातील तीन केंद्रांवर घेण्यात येणार आहे. या परीक्षेच्या आयोजनासाठी नुकतीच मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपाध्यक्ष जिल्हा आयोजन व सनियंत्रण समिती, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा-२०२४ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या समितीच्या सदस्य सचिव तथा राजिप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी परीक्षेची बैठक व्यवस्था, पोलीस बंदोबस्त, कस्टडी रुम (प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व स्वाक्षरीपट ठेवण्यासाठी), जिल्हा नियंत्रण कक्ष, परीक्षा केंद्र, अधिकारी, कर्मचारी नेमणुका, वाहन व्यवस्था, व्हिडीओ चित्रीकरण व भरारी पथक यांना याबाबत माहिती दिली.

परीक्षा ही पनवेल शहरातील के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालय, सेक्टर १८, सिडको कॉलनी, नवीन पनवेल येथे सकाळ सत्र स.१०.३० ते दु.१ या कालावधीत होणार असून पेपर -१साठी ६८२ परिक्षार्थी व दुपार सत्र दु. २.३० ते ५.०० या कालावधीत पेपर-२ साठी ६८२ परिक्षार्थी बसणार आहेत.

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माध्यमिक, सेक्टर १ ई. सिडको कॉलनी, कळंबोली मॅक्डोनाल्डच्या पाठीमागे, पनवेल येथे सकाळ सत्र स.१०.३० ते दु.१ या कालावधीत पेपर-१साठी ७६० परिक्षार्थी व दुपार सत्र दु. २.३० ते ५ या कालावधीत पेपर -२ साठी ८६५ परिक्षार्थी असणार आहेत, तर चांगू काना ठाकूर विद्यालय, जनार्दन भगत मार्ग प्लॉट न.८ सेक्टर- १४, सिडको कॉलनी, नवीन पनवेल येथे दुपार सत्र दु.२.३० ते ५ या कालावधीत पेपर -२ साठी ४०९ परिक्षार्थी असे एकूण ३,३९८ परिक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

या परिक्षेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक व योजना) व शिक्षणाधिकारी, पनवेल महानगर पालिका पनवेल यांची भरारी पथके तयार करण्यात आली आहेत, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव यांनी सांगितले.

## निवडक

### चेंढरे येथे स्वच्छता अभियान



**अलिबाग** : दिवाळी विथ माय भारत या उपक्रमांतर्गत २७ ते ३० ऑक्टोबरदरम्यान विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने नेहरू युवा केंद्र व प्रिझम सामाजिक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानगर चेंढरे येथील समाजमंदिर व आजूबाजूच्या परिसराची जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी गोंधळी यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत सामाजिक क्षेत्रातील व स्थानिक महिला सहभागी झाल्या होत्या, तसेच स्पर्धा विश्व अकॅडमीचे युवक-युवतीदेखील सहभागी झाले होते.

### 'अंजुमन इस्लाम'तर्फे फराळवाटप




**मुरुड** : अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन शिक्षण विस्तार विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्यामार्फत नुकतेच शीघ्रे आदिवासीवाडी येथे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीनिमित्त कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. जावेद खान, प्रा. निदा गोरमे आणि विद्यार्थ्यांमध्ये हुमेरा घारे, सना कारभारी, रोज्मीन कासकर, रुकय्या शिघ्रेकर, तयाबा कडू यांनी मेहनत घेतली. या उपक्रमासाठी आदिवासी वाडीचे प्रमुख गुलाब वाघमारे आणि समीर वाघमारे यांचे सहकार्य लाभले.

### मुरुड-तळामार्गे पुणे बससेवा सुरू

**तळा** : मुरुड-तळामार्गे पुणे बससेवा सुरू झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तळा ते पुणे बससेवा अचानक बंद केल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली होती. तळा बसस्थानकातून सकाळी ७ वा. सुटणाऱ्या तळा ते पुणे बसमधून लोणेरे येथे बाटू महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच कामानिमित्त महाड व पुढे पुणे येथे जाणाऱ्या नागरिकांना ही बस सोयीची होती, मात्र अचानक ही बससेवा बंद केल्याने खासगी वाहनाने जास्तीचे पैसे खर्च करून प्रवास करावा लागत होता. एसटी महामंडळाने मुरुड, तळामार्गे पुणे बससेवा सुरू केल्याने महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रवासीवर्गाकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. ही बस तळा बसस्थानकातून सकाळी ६.४५वा. सुटणार आहे.

# खांब येथे परसबाग निर्मितीचे प्रात्यक्षिक

**रोहा : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील खांब येथे परसबाग निर्मितीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र रोहामार्फत आणि कृषी महाविद्यालय दापोलीच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कार्यरत असलेल्या कृषी संजीवनी गटातील कृषीदूतांनी प्रात्यक्षिक दाखविले.

या प्रात्यक्षिकांतर्गत परसबाग आपल्या आरोग्याबरोबरच पर्यावरणासाठीही महत्त्वाची ठरते. ताज्या भाज्या, मसाले आणि औषधी वनस्पतींचे उत्पादन करून, किचन गार्डन व्यक्तीला स्वयंपाकात नैसर्गिक आणि सेंद्रिय अन्न मिळवण्याची संधी देते. यामुळे अन्नाच्या गुणवत्तेत वाढ होते आणि केमिकल्सपासून दूर राहता येते, तसेच हे आरोग्यदायी आहाराचा एक भाग बनते, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत होते. आर्थिकदृष्ट्यादेखील घरच्या बागेतले अन्न उत्पादनामुळे खर्चात बचत होते. पर्यावरणीय दृष्टीने, किचन गार्डन लागवडीमुळे वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होते आणि बायोडायवर्सिटी वाढवण्यास हातभार लागतो.

या सर्व कारणांमुळे किचन गार्डनची महत्त्वता अधिक वाढली आहे. विशेषतः शहरांमध्ये जिथे लोकांना ताजे अन्न मिळवण्यासाठी पर्यायी स्रोतांची आवश्यकता असल्याची माहिती यावेळी कृषीदूतांकडून देण्यात आली. या प्रात्यक्षिकांसाठी डॉ. कुलकर्णी तसेच कृषी विज्ञान केंद्र रोहाचे डॉ. मनोज तलाठी व डॉ. आरेकर, डॉ. मांजरेकर यांचेही मार्गदर्शन लाभले.

# शेकापचे माजी नगरसेवक आशिष दिवेकर समर्थकांसह शिवसेनेत

**मुरुड : प्रतिनिधी**



शेकापचे माजी नगरसेवक आशिष दिवेकर यांनी आपल्या समर्थकांसह आमदार महेंद्र दळवींच्या उपस्थितीत नांदगाव माळी समाज हॉल येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार दळवी यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन आशिष दिवेकर यांनी शेकापचा त्याग करीत शिवसेनेत प्रवेश केला आहे.

त्यांच्यासमवेत रतिश रणदिवे, दीपेश गुरव, संकल्प दिवेकर, रोहन दिवेकर, अनिकेत विरकुड, मनोज वीरकुड आदींनी शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी आमदार दळवी यांनी सर्वांचे पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

या वेळी आमदार दळवी यांनी आशिष दिवेकरसारखा खमदा कार्यकर्ता शिवसेनेत आल्याने निश्चितच शिवसेनेची ताकद वाढणार आहे. पक्षामध्ये आशिष दिवेकर व त्यांच्या समर्थकांचा उचित सन्मान राखला जाणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

आशिष दिवेकर यांनी सांगितले, आमदार दळवी यांनी मुरूड शहराच्या विकासासाठी सर्वांत मोठा निधी आणला आहे. त्यांच्या या विकासाच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन शहराचा आणखी विकास व्हावा यासाठी शिवसेनेच्या प्रवाहात सहभागी झालो आहोत. त्यांना निवडून आणण्यासाठी मी व माझे समर्थक मोठी मेहनत घेऊन मोठ्या मताधिक्क्याने आमदार दळवी यांना विजयी करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# मुरूडमध्ये 'कोमसाप'तर्फे सत्कार सोहळा

**मुरूड : प्रतिनिधी**



कोकण मराठी साहित्य परिषद मुरुड शाखेतर्फे सत्कार सोहळ्याचे आयोजन चित्रकार मंगेश पाटील यांच्या फार्महाऊसवर करण्यात आले. प्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, श्री गणेशाला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या वेळी उर्मिला नामजोशी, डॉ. रोहिदास दुसार, ज्येष्ठ उद्योजक सुनील झोडे, ज्येष्ठ गायक डॉ.रवींद्र नामजोशी, कोमसाप मुरूडचे अध्यक्ष संजय गुंजाळ, कार्याध्यक्ष अरुण बागडे, उपाध्यक्ष उषा खोत, सचिव नैनिता कर्णिक, नगर परिषद शिक्षण समिती प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक, प्रफुल्ल कदम,सदस्य आशिष पाटील, लक्ष्मण ठाकूर, माजी मुख्याध्यापिका वैशाली कासार, माजी शिक्षिका प्रज्ञा सदरे, शकुंतला रोटकर, वासंती उमरोटकर, गझलकार सिद्धेश लखमदे, आशिष पाटील, महेंद्र पाटील आदींसह सर्व सदस्य उपस्थित होते.

माजी डीवायएसपी डॉ. रोहिदास दुसार यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल तसेच ज्येष्ठ उद्योगपती सुनील झोडे यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. डॉ.रोहिदास दुसार यांनी, घरातील परिस्थिती अत्यंत बिकट होती या आर्थिक परिस्थितीला सामोरे जाऊन शिक्षण पूर्ण करून शिक्षकी पेशापासून असिस्टंट पोलीस कमिशनरपर्यंत कसा पोहचलो, त्यानंतर पीएचडी केली आणि डॉक्टरकी पदवी प्राप्त झाली. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात पुढे जायचे असेल तर आपल्यामध्ये जिद्द व चिकाटी पाहिजे, तरच आपण आपले ध्येय गाठू शकतो, असे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन उर्मिला नामजोशी व आभार प्रदर्शन सचिव नैनिता कर्णिक यांनी मानले.

# निजामपुरात दिवाळी पहाट एक सुरेल मैफिल

**माणगाव** : तालुक्यातील बाबूशेठ खानविलकर मित्रमंडळ निजामपूर विभाग यांच्यातर्फे आयोजित दिवाळी पहाट एक सुरेल मैफिलीचे आयोजन गुरुवारी (दि.३१) सकाळी ५:३० वा.जुनी बाजारपेठ निजामपूर याठिकाणी करण्यात आले आहे.

साई समर्थ प्रोडक्शन पुणे प्रस्तुत हिंदी-मराठी गीतांचा एक सुरेल नजराणा व सोबत धमाल कॉमेडी दिवाळी पहाट एक सुरेल मैफिल या कार्यक्रमात कलर्स मराठी जय जय महाराष्ट्र माझा फेम गायिका प्राजक्ता महामुनी, युवा गायक रवी जवळेकर, संगीत संयोजक गणेश महाडिक हे या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित रसिक प्रेक्षकांना आपल्या सुरेल आवाजाने व धमाल कॉमेडीने मंत्रमुग्ध करणार आहेत.

# रायगडात सात मतदारसंघांसाठी पोलीस निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगडातील सात विधानसभा मतदारसंघात निवडणूक शांत व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत या मतदारसंघांसाठी खर्च तसेच कायदा व सुव्यवस्थेसाठी स्वतंत्र निरीक्षक नेमण्यात आले आहेत. हे सर्व निवडणूक निरीक्षक संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

पनवेल, कर्जत मतदारसंघासाठीसाठी दुनी चंद राणा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उरण आणि पेण मतदारसंघासाठी संतोष कुमार राय तर अलिबाग, श्रीवर्धन आणि महाडसाठी सतीश कुमार एस. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारसंघात उमेदवारांच्या नामनिर्देशन प्रक्रियेपासून ते मतमोजणीपर्यंत प्रत्यक्ष उपस्थित राहून पाहणी करतील, तसेच मतदान यंत्रे व मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांची सरमिसळ, उमेदवारी अर्ज छानणी, प्रत्यक्ष मतदानाचा दिवस, निवडक मतदान केंद्रांच्या संविधानिक कागदपत्रांची छाननी, मतमोजणी व विजयी उमेदवाराची घोषणा या सर्व प्रसंगी हे निरीक्षक उपस्थित राहतील.

निवडणुकीदरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस निवडणूक निरीक्षक म्हणून स्वप्नील ममगाई यांचीदेखील नियुक्ती करण्यात आली आहे. समाजातील विविध घटकांचा निवडणूक प्रक्रियेत सहभाग, कायदा- सुव्यवस्था याबाबत हे निरीक्षक आयोगाला अहवाल सादर करणार आहेत.

# फणसाड अभयारण्यात पक्षीगणना यशस्वी

## पक्ष्यांच्या १६६ प्रजातींची नोंद




**मुरूड : रामप्रहर वृत्त**

मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात नुकताच ग्रीन वर्क्स ट्रस्ट आणि एस. बी. आय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच महाराष्ट्र वनविभाग, ठाणे (वन्यजीव) विभाग यांच्या सहकार्याने फणसाड अभयारण्य येथे पक्षीगणनेचा कार्यक्रम २५ ते २७ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला होता. या गणनेत एकूण १६६ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली.

गणनेत एकूण पाच राज्यांमधून ३५ पक्षी निरीक्षक त्याचप्रमाणे ग्रीन वर्क्स ट्रस्टचे १५ स्वयंसेवक आणि १५ वन कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. ठाणे वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक अक्षय गजभिये, फणसाड वन्यजीव अभयरण्याचे सहाय्यक वनसंरक्षक मनोहर दिवेकर तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले.

वैज्ञानिक पद्धतीने राबविल्या गेलेल्या या गणनेत एकूण १६६ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली. पक्षीगणनेबरोबरच अभयारण्यातील इतर जैवविविधतेची नोंद सहभागी लोकांनी केली. त्यात एकूण ५१ प्रजातींची फुलपाखरे, १८ उभयचर प्राणी, ९ साप प्रजाती तसेच १६ सस्तन प्राण्यांची नोंद झाली आहे. अभयरण्याच्या विविध भागत तसेच फणसाडसारख्या जैवविविधता पूर्ण जंगलात लोकांनी जंगलाच्या विविध भागात जाऊन आपली निरीक्षणे नोंदवली.

गणनेआधी सहभागी लोकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली तसेच अभयरण्याच्या पर्यटन संकुलात त्याचा सरावदेखील घेतला गेला. अशाप्रकारचे उपक्रम अभयारण्यात वर्षभर राबवविले जाणार असून पुढील पक्षीगण जानेवारी महिन्यात करण्यात येईल, अशी माहिती ट्रस्टचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निखिल भोपळे यांनी दिली.

# नागोठणे शहरात भटक्या कुत्र्यांची दहशत

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**



शहरात सर्वत्र मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांची नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. टोळीटोळीने फिरणाऱ्या व रहदारीच्या रस्त्यावरच ठाण मांडून बसणाऱ्या या भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांना विशेषतः लहान मुले व महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे.

सध्या तर या भटक्या कुत्र्यांची नागोठणे बाजारपेठेत भटकंती सुरू असल्याने बाजारात दिवाळीनिमित्त खरेदी करण्यासाठी येणारे नागरिक विशेषतः महिलावर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या मोकाट भटक्या कुत्र्यांचा ग्रामपंचायतीने ठोस उपाययोजनेद्वारे बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

या कुत्र्यांकडून नागोठणे शहरांत लहान मुले, नागरिक यांच्यावर हल्ला चढवून त्यांना जखमी करण्याचे प्रकारही यापूर्वी घडले आहेत. मुख्य रहदारीचे रस्ते, बाजारपेठ, मटण व मासळी बाजार, तसेच अनेक मोक्याच्या ठिकाणी ही भटकी कुत्री गटाने एकत्रितपणे उभी राहात असल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत ग्रामपंचायतीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## बेदरकार वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.२८) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण २२२ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ९८ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

# महायुतीचे शक्तिप्रदर्शन

































**कामासाठी मुलगा पाहिजे**

**अनुभव** :- MS-CIT, Tally
कमीत कमी १ वर्षे अनुभव
**पत्ता** :- श्री.गणेश टेड्रर्स गाळा नं ४७-५० मार्केट यार्ड पनवेल
**मो.नं** :- ८६८९८९३७१५
९०२९३३९९९९

**Salary: 15000 ते 18000**





जीवेत् शरदः शतम्!

**यल्लालिंग दिग्गी**

यांना वाढदिवसाच्या

**हार्दिक शुभेच्छा**



शुभेच्छुक
ब्रिजेश शुक्ला

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com